गमतीदार गोष्टी


माधुरी भिडे



ज्योत्स्ना प्रकाशन

गमतीदार गोष्टी

माधुरी भिडे



ज्योत्स्ना प्रकाशन

ज्योत्स्ना प्रकाशन

प्रकाशक :
मिलिंद ल. परांजपे
ज्योत्स्ना प्रकाशन
'धवलगिरी'
४३०-३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०


मुंबई ऑफिस :
१६२-ब ज. शंकरशेठ मार्ग,
मोहन बिल्डिंग, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुखपृष्ठ व आतील चित्रे :
पुंडलिक वझे

प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर २००३

मुद्रक :
संदीप प्रिंटर्स
१११ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०





अनुक्रमणिका

सवाई थापाड्या

(स्वीडीश लोककथा)



फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. एका छोट्याशा राज्यात एक राजकन्या होती. आता राजकन्या म्हणजे कशी सुंदर, शहाणी, गुणी असायला हवी, नाही का?

ही राजकन्याही तशी सुंदर होती, पण एक नंबरची थापाडी. तिच्या ह्या थापेबाजपणाची कीर्ती सगळीकडे पसरली होती. त्यामुळे राजकन्या मोठी झाली तरी तिला लग्नासाठी कुठल्याही राजपुत्राकडून मागणी येईना. राजाला तिच्या लग्नाची मोठी काळजी पडली होती.

शेवटी राजाला एक युक्ती सुचली. राजकन्येहून थापाड्या नवरा राजकन्येसाठी शोधून काढायचा, म्हणजे एका दगडात दोन पक्षी. राजकन्येचं लग्नही होईल आणि तिच्या थापाड्या स्वभावाला जरा आळा बसेल.

झालं! राजाने ताबडतोब दवंडी पिटवली—

ऐका हो ऐका. जो कोणी राजकन्येहून जास्त थापा मारून दाखवेल आणि हे खरं नाही, थाप आहे, असं तिला म्हणायला लावेल त्याला राजकन्या आणि अर्धं राज्य मिळेल हो ऽऽऽ

ही दवंडी राज्यातल्या साऱ्यांनी ऐकली आणि राजवाड्याकडे माणसांची रीघ लागली. प्रत्येकजण मोठमोठ्या थापा तयार करून येऊ लागला, पण राजकन्येपुढे कोणाचंच चालेना. ती सगळ्यांच्या थापा ऐकून घ्यायची आणि त्याच्याहून मोठी थाप तिच्याजवळ तयारच असायची.

धोंड्याच्या थोरल्या दोन भावांचीही तीच गत झाली. ते दोघे स्वतःला मोठे हुशार समजायचे आणि धाकट्या धोंड्याला नेहमी

हिडीसफिडीस करायचे. राजाची दवंडी ऐकल्यावर मोठ्या ऐटीत दोघेजण राजकन्येला जिंकायला गेले आणि दुसरे काय होणार?... हरले.

आता धाकट्या धोंड्यालाही वाटायला लागलं की, आपणही एकदा प्रयत्न करावा. त्याचे भाऊ त्याला धोंड्या म्हणत असले, तरी तो काही वेडपट नव्हता. चांगला चलाख होता.

तो राजकन्येला भेटायला गेला, तेव्हा राजकन्या आपल्या वडलांच्या भल्या मोठ्या शेतात हिंडत होती. धोंड्या तिच्यासमोर जाऊन उभा राहिला.

त्याच्याकडे पाहून राजकन्या ऐटीत म्हणाली,

''थापा मारून हरायला आलास वाटतं? चल, तुला आमचं शेत दाखवते.''

धोंड्या मुकाट्याने तिच्याबरोबर निघाला. राजकन्या मोठ्या अभिमानाने म्हणाली,

''आमचं शेत पाहिलंस केवढं आहे? एका बांधावर उभं राहून शिंग फुंकलं तर दुसऱ्या बांधाला आवाज ऐकूसुद्धा जात नाही.''

धोंड्या म्हणाला,

''हे शेत काहीच नाही. आमच्या शेतात जर एका बांधापासून एखादं वासरू निघालं, तर शेताच्या दुसऱ्या टोकाला पोचेपर्यंत त्याचा मोठा बैल होतो.''

राजकन्या रागावली. पण धोंड्या थापा मारतोय असं म्हणाली असती, तर हरली असती ना! म्हणून ती म्हणाली,

''असेल. पण आमचे बैल तर बघ. आमच्या बैलाच्या दोन शिंगांवर दोन माणसं बसली आणि एकानं वीस फूट लांबीची काठी धरली तर काठीचं टोक दुसऱ्या माणसापर्यंत पोचत नाही.''

धोंड्या म्हणाला,

''आमच्या शेतातले बैल एवढे मोठे आहेत की, एका शिंगावर बसलेल्या माणसानं जर ढोल वाजवला तर दुसऱ्या शिंगावर बसलेल्या माणसाला ऐकू जात नाही.''



राजकन्या म्हणाली,

"असेल; पण आमच्याकडे दूध इतकं आहे की लोणी ठेवायला मोठमोठे हौद बांधलेत."

धोंड्या म्हणाला,

"हो का? आमच्याकडेसुद्धा खूपच दूध असतं. लोणी कढवून तूप निघतं ना, ते ठेवायला एक मो ऽ ठ्ठी विहीर केलीय. वर रहाट लावलाय– तूप लागलं की बादली भरून काढून घ्यायचं. तर एकदा काय गंमत झाली, आमची एक घोडी चुकून त्या विहिरीत पडली. पण विहीर एवढी मोठी की, सात वर्षं तूप खाल्लं तेव्हा कुठे ती घोडी पुन्हा सापडली."

धोंड्याच्या ह्या थापेपुढे राजकन्येला पटकन उत्तर सुचलं नाही. तोच धोंड्या पुढे म्हणाला,

"पुढे एकदा मी त्याच घोडीवर माल लादून चाललो होतो. तेवढ्यात तिच्या पाठीचा कणाच मोडला. पण मी घाबरलो नाही. चटकन तिथे एक पिंपळाचं रोप होतं ते घेतलं आणि तिच्या पाठीत बसवून टाकलं. पुढे ते रोप मोठं झालं. त्याचा मोठा वृक्ष झाला. मग एक दिवस मी त्याच्यावर चढलो तर सरळ स्वर्गात गेलो. तिथे काही अप्सरा समुद्रातल्या लाटांचा फेस घेऊन त्याचे दोर वळत बसल्या होत्या. तेवढ्यात एकदम तो वृक्ष मोडला. मग




त्या अप्सरांनी मला त्या लाटांच्या फेसांच्या दोऱ्या बांधून खाली सोडलं. मी जो खाली आलो, तो एका कोल्ह्याच्या बिळात पडलो. तिथे माझी आई आणि तुझे वडील बूट शिवत बसले होते.''

एवढे ऐकल्यावर राजकन्या एकदम चिडून म्हणाली,

''मुळीच खरं नाही हे. माझे वडील चांभाराचं काम करणं शक्यच नाही मुळी. थापा मारतोस तू.''

धोंड्याचं काम झालं. राजकन्या हरली. मग धोंड्याला अर्धं राज्य मिळालं आणि राजकन्येशी त्याचं लग्न झालं हे सांगायला नकोच.



पेडगावचे शहाणे

(इंग्लिश लोककथा)

बाजारात तुरी आणि...!

एकदा काय झालं, गोथॅमची दोन माणसं बाजारात निघाली.

एकाने दुसऱ्याला विचारलं, ''आज काय खरेदी?''

''थोडी मेंढरं घ्यावी म्हणतोय!''

''येताना कुठल्या रस्त्यानं येणार तू?''

''अर्थात पुलावरच्या रस्त्यानं.''

''छे छे, पुलावरून आणायची नाहीत हं मेंढरं! बजावून ठेवतो तुला.''

''वा रे वा, तू कोण सांगणारा? मी हवी तिथून आणीन माझी मेंढरं!''

झालं! दोघांमध्ये भांडण जुंपलं, ते गुद्यांवरही आलं.

तिसरा एक गोथॅमचा माणूस पाठीवर पिठाचं पोतं घेऊन तिथून चालला होता. त्या दोघांना मारामारी करताना पाहून तो त्यांच्याजवळ आला.

त्यांना जवळ बोलावून त्याने आपलं पिठाचं पोतं त्यांना जरा धरायला सांगितलं.

मग त्याने पोत्याचं तोंड उघडून आतलं पीठ नदीत टाकून दिलं आणि रिकामं पोतं झटकत तो म्हणाला,

''मूर्खांनो, असे वेड्यासारखे भांडताय काय? माझ्या या पोत्याइतकीच तुमची डोकी पण रिकामी दिसतात.''





कुंपण

एकदा गोथॅमच्या लोकांनी ठरवलं की, कोकिळेचं गोड गाणं आपल्याला नेहमी ऐकायला मिळालं पाहिजे. लगेच त्यांनी एक कोकिळा पकडली. तिला एका झाडावर ठेवली आणि ती पळून जाऊ नये म्हणून भोवती चांगलं सहा फूट उंच कुंपण घातलं.

. . बघतात तो काय, थोड्या वेळाने कोकिळा कुंपणावरून उडून गेली. गोथॅमच्या माणसांना फार वाईट वाटलं. ते मोठ्याने रडत रडत म्हणू लागले,

''अरे, अरे, किती आम्ही मूर्ख! कुंपण आणखी थोडं उंच केलं असतं तर कोकिळा उडून गेली नसती.''



बारावा माणूस कुठे गेला?

गोथॅमची बारा माणसं एकदा मासे पकडायला गेली. मासे पकडून परत येताना त्यांना वाटलं की, आपण बाराहीजण परत आलो आहोत की नाही ह्याची खात्री करून घेतली पाहिजे.

त्यांच्यातल्या एकाने मग मोजायला सुरुवात केली पण तो स्वतःला मोजायला विसरला. त्यामुळे अकराच माणसं भरली. सारेजण घाबरले. पुन्हा पुन्हा मोजायला लागले पण प्रत्येकजण स्वतःला मोजायला विसरायचा आणि प्रत्येक वेळी माणसं अकराच भरत. शेवटी त्या गोथॅमच्या बारा लोकांची खात्री झाली की, आपल्यापैकी एकजण हरवला आहे. ते त्याला इकडे तिकडे शोधायला लागले.

तेवढ्यात तिकडून एक हुषार माणूस आला. हा अर्थातच गोथॅमचा नव्हता.

तो म्हणाला. "अरे, काय शोधताय?"

गोथॅमची माणसं म्हणाली,

"महाराज, आम्ही बाराजण मासे पकडायला गेलो होतो, पण आता पाहतो तो आमच्यांतला एकजण हरवला आहे. त्याला आम्ही शोधत आहोत."



तो हुषार माणूस आपल्याशीच हसला आणि म्हणाला, ''मी देतो तुमचा बारावा माणूस शोधून. पण त्याबद्दल तुम्ही पकडलेले सगळे मासे मला दिले पाहिजेत.''

गोथॅमची माणसं आनंदानं कबूल झाली. तेव्हा त्या हुषार माणसाने एक चाबूक घेतला आणि प्रत्येकाला एक-एक फटका द्यायला सुरुवात केली. प्रत्येकजण ओरडला की तो एक आकडा मोजायचा. असे बारा आकडे मोजून झाल्यावर तो म्हणाला,

''हे घ्या. बाराजण होतात ना तुम्ही?''

''महाराज, तुम्ही होतात म्हणून आमचा मित्र सापडला.'' आणि आपले सारे मासे त्या हुषार माणसाला देऊन टाकून ती गोथॅमची माणसं मोठ्या खुशीत घरी गेली.

निरोप्या

बरेच दिवस गोथॅमच्या काही लोकांचं घराचं भाडं जमीनदाराकडं पाठवायचं राहिलं होतं. जमीनदाराचं घर बरंच दूर होतं. त्यामुळे भाडं कोणाबरोबर पाठवावं ते त्यांना सुचेना.

शेवटी त्यांना एक झकास युक्ती सुचली. त्यांनी एक ससा पकडला. भाड्याचे पैसे आणि चिठ्ठी त्याच्या पाठीला बांधून त्याला सांगितलं, ''हे बघ, ह्या रस्त्याने सरळ गेलास की जमीनदाराचं घर लागतं. नीट जा हं.''

सशाला सोडल्याबरोबर तो कुंपणात पळाला. त्याच्याकडे कौतुकाने पाहत गोथॅमचे लोक म्हणाले, ''काय चलाख ससा आहे हो? कुणी आपले पैसे काढून घेईल म्हणून कसा लपतछपत निघालाय बघा.''

आपण सशाबरोबर पाठवलेले भाड्याचे पैसे जमीनदाराला का पोचले नाहीत ते गोथॅमच्या लोकांच्या कधीच लक्षात आलं नाही.





हरबाचं नशीब

(रशियन लोककथा)

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. एक होता शेतकरी. मोठा श्रीमंत नसला तरी खाऊन-पिऊन सुखी होता. गावांत घर होतं, रानात शेत होतं. गोठ्यात गाई-गुरे होती. आपल्या चार मुलांना घेऊन तो शेतात खपत होता. सुखात राहत होता.

थोरल्या मुलाचं नाव होतं, सोनबा. त्याच्या पाठचे ग्यानबा आणि नारबा आणि सगळ्यात धाकटा हरबा.

सोनबा, ग्यानबा आणि नारबा मोठे हुशार होते. घराची, जमिनीची व्यवस्था पाहायची, बाजारहाट करायचा. अशी सगळी कामं ते करायचे. आपल्या हुशारीचा त्यांना मोठा अभिमान होता. ह्याउलट धाकटा हरबा आपला भोळा होता. जरा वेडाबागडाच म्हणा ना! मोठे तिघे त्याची थट्टा करायचे.

पुढे काही दिवसांनी शेतकरी आजारी पडला. तेव्हा त्याने आपल्या चारी मुलांना जवळ बोलावून म्हटले, ''बाळांनो, आता माझी काही आशा नाही. मी आता चाललो. माझ्यामागे प्रेमाने राहा. हरबाला सांभाळा.''

मुलं म्हणाली, ''हो बाबा. तुम्ही अगदी काळजी करू नका.''

शेतकरी मेला आणि मुलं त्याने सांगितलेलं सगळं विसरली. त्यांनी शेताच्या, घराच्या तीन सारख्या वाटण्या केल्या. सगळं आपापसांत वाटून घेतलं, आणि हरबाला? हरबाला दिली एक म्हातारी हडकुळी गाय.

वर म्हणाले, ''हरबा, तुला काही शेती-बिती सांभाळायला जमणार नाही. तू आपला होईल ते काम करीत जा. तुझ्या पोटाला भाकरी आम्ही देऊ.''

पाहिलंत कसे हुशार होते तिघेजण! हरबाला वाटणी दिली नाहीच. पुन्हा आपला राबायला अन्नावारी गडी मिळाला.

बिचारा हरबा. त्याने मुकाट्याने आपल्या वाटणीची गाय घेतली आणि भावांना म्हणाला,

''उद्याच्या बाजाराला घेऊन जातो हिला. विकून काय चार पैसे येतील ते पाहतो.''

तिघे मोठ्याने हसले. नारबा खवचटपणे म्हणाला, ''सांभाळून हो, नाहीतर गाईऐवजी बैल म्हणून स्वतःलाच विकून घेशील.''

हरबा काही बोलला नाही. गाईचं दावं धरून तो बाजारात जायला निघाला. वाटेत जंगल होतं. हरबा आपला वाटेतल्या मोठ्या-मोठ्या झाडांकडे बघत मजेत चालला होता.

चालता चालता त्याला एक पिंपळ दिसला. जोराचा वारा सुटला होता. पिंपळाच्या फांद्या हलत होत्या. पानं सळसळत होती. गार सावली होती. हरबा जरा झाडाच्या सावलीत स्वस्थ उभा राहिला. मनात विचार करायला लागला, 'आता बाजारात जाईन. कोण बरं विकत घेईल माझी गाय? खूप पैसे मिळतील नाही का? एवढी मोठी गाय. खूप पैसे पडत असणार तिला.'

आपल्या विचारात हरबा रंगून गेला. तेवढ्यात वाऱ्यामुळे रस्त्यातल्या एका पिंपळाच्या फांद्या जोराने हलल्या. आवाज झाला, 'कर्रऽ कर्र,'

हरबाने पिंपळाकडे पाहून विचारलं,


''काही म्हणालास तू?''

''कर्रऽ कर्रऽ कर्र,'' फांद्या पुन्हा वाजल्या.

हरबानं डोकं खाजवलं– काय बरं म्हणत असेल हा पिंपळ? तेवढ्यात त्याचं लक्ष गाईकडे गेलं. एकदम लक्षात येऊन तो म्हणाला,

''हां, हां. माझी गाय विकत घ्यायचीय हो तुला? हात्तेच्या! मग घे की. मी विकायलाच तर निघालोय. पण पैसे किती देशील?''

''कर्रऽ कर्र,'' झाड वाजलं.



"दोनशे रुपये?" हरबा खूष होऊन म्हणाला, "अरे वा! मग मी मोठा श्रीमंतच होणार म्हणायचा. बरं, ही बघ इथे गाय बांधली. दे पाहू आता पैसे." आणि त्याने गाय पिंपळाच्या खोडाला बांधली.

"कर्रऽ कर्रऽ कर्र," झाड वाजलं.

"उद्या देशील?" हरबा म्हणाला, "बरं, पण बघ हं. नक्की द्यायला पाहिजेत. मी पहाटेच येईन पैसे घ्यायला."

आणि गाईला तिथेच सोडून हरबा मोठ्या आनंदाने घरी आला.

हात हलवत हरबाला परत येताना पाहून सोनबाने हसत हसत विचारलं,

"काय हरबा, केवढ्याला विकली गाय?"

"कोण गाढव भेटला तुझी ती मरतुकडी गाय घेणारा?" नारबा थट्टा करत म्हणाला.

हरबा खुशीत होता. मोठ्या आनंदाने तो म्हणाला, "अरे, रानातल्या पिंपळानं घेतली माझी गाय. दोनशे रुपये देणार आहे."

"कोण? रानातला पिंपळ दोनशे रुपये देणार आहे तुला?" ग्यानबा खिदळत म्हणाला, "तू इतका मूर्ख असशील असं वाटलं नव्हतं रे. आता वाट बघ तुझ्या दोनशे रुपयांची आणि गाईचीही."

नारबा हसत म्हणाला, "रातोरात एखादा चोर नेईल पळवून तुझी गाय."

"वेडा रे वेडा," तिघेही भाऊ म्हणाले.

हरबा बिचारा हिरमुसला झाला, पण तरीही दुसऱ्या दिवशी सकाळी तो रानात गेला.

पिंपळाजवळ जाऊन पाहतो तो काय? तिथे बांधलेली गाय नाही. हरबा रागावला.

"कुठाय माझी गाय?" त्याने रागाने पिंपळाला विचारलं.

'सळ्ऽ सळ्ऽ सळ्,' वाऱ्याने हलणाऱ्या पानांचा आवाज आला.

"काय म्हणतोस? रात्री वाघानं नेली?
मग माझे दोनशे रुपये टाक अगोदर."

'सळ्ऽ सळ्ऽ सळ्,' पाने हलली.

"काय म्हणतोस? उद्या देशील?" हरबा म्हणाला. त्याला घरी आपली थट्टा करण्यासाठी टपलेले भाऊ आठवले. रागावून तो म्हणाला, "अरे जा रे. मला फसवतोस काय? पण मी फसेन होय असा? थांब, माझ्या कुऱ्हाडीने तुझे तुकडे तुकडे करून टाकतो."

असं म्हणून हरबाने पिंपळाच्या खोडावर कुऱ्हाड घातली.

तो काय आश्चर्य? झाडातून एकदम पोकळ आवाज आला. हरबाने चाचपून पाहिलं तो झाडाच्या खोडात एक ढोली होती आणि ढोलीत होती एक थैली.

हरबाने आश्चर्याने थैली उघडली. आत होते कलदार चांदीचे रुपये.

"अरेच्या! हे कुठले पैसे?" हरबा चकित होऊन म्हणाला.

'सळ्ऽ सळ्ऽ सळ्,' झाडाची पानं वाजली.

हरबाने झाडाकडे पाहिलं.

"असं असं," तो म्हणाला, "कुणा


चोरानं लपवले वाटतं हे पैसे तुझ्या ढोलीत? आणि माझ्या गाईची किंमत म्हणून हे घेऊ म्हणतोस? बरं, चालेल की.''

हरबाने थैली उचलली आणि घरी आला. त्याचे भाऊ त्याची थट्टा करण्यासाठी टपलेले होतेच.

''गाय दिसली नाही'' नारबा म्हणाला, ''मिळाले की नाही दोनशे रुपये?''

''दोनशे रुपये का म्हणून? दोन हजार मिळाले,'' हरबा अभिमानाने म्हणाला.

त्या पैशांतून हरबाने जमीन विकत घेतली, छोटंसं घर बांधलं आणि शेती करत तो सुखाने रहायला लागला.



परीराणीची देणगी

(रशियन परीकथा)

रूपा नावाची एक मुलगी होती. आपल्या नावाला शोभेशीच सुंदर, गोजिरवाणी आणि नाजूक, पण बिचारी तितकीच दुर्दैवीही होती. पोरकी होती ती. ना आई, ना वडील.

कुणा एका दूरच्या आत्याकडे राहत असे बिचारी. महाद्वाड आणि खाष्ट होती ही आत्या. तिलाही रूपाएवढीच एक मुलगी होती. तिचं नाव चंदा. चंदा दिसायला सुंदर होती, पण मोठी गर्विष्ठ होती.

आत्याचा चंदावर फार जीव. कौतुकाने ती तिला चंदाराणी म्हणे. मोठ्या अभिमानाने ती म्हणे, ''किती सुरेख आहे माझी चंदाराणी. राजाची राणी शोभेल माझी बाळी!''

बिचाऱ्या रूपाच्या वाटणीला मात्र ह्या कौतुकाचा शब्दसुद्धा येत नसे. तिच्या वाट्याला नुसतं काम यायचे. केर-वारे, धुणी-भांडी, स्वयंपाक-पाणी. तिच्याशी कुणी एक शब्दसुद्धा बोलत नसे.

शेजारी-पाजारी तिचे हाल बघून हळहळत. म्हणत,

''त्या चंदापेक्षा रूपाच शोभेल राजाची रांणी. किती गोड चेहरा आहे तिचा.''

रोज सकाळी रूपा आपली घागर घेई आणि विहिरीवर पाणी भरायला जाई. विहिरीतून जडजड घागरी ओढता ओढता दमून जाई आणि जरा विश्रांतीसाठी विहिरीच्या काठावर बसून आतल्या खोल पाण्याकडे बघत राही. एक दिवस ती अशीच विहिरीवर पाणी भरायला गेली, तो काय गंमत!

विहिरीच्या काठावर एक छोटासा मळका झगा पडलेला.

पहिल्यांदा रूपाला वाटलं की, कुठल्यातरी मुलीने आपल्या बाहुलीचा झगा टाकला असणार. पण नीट पाहते तो अगदी तलम भारी कापडाचा झगा होता तो.

रूपा मनाशी म्हणाली,

'कुणातरी परीचा झगा असणार हा. मी सुरेख धुऊन इस्त्री करून ठेवीन हा तिच्यासाठी!'

रूपाने तो झगा छान धुऊन इस्त्री करून परत ठेवला.

त्या दिवसानंतर रोज एक मळका झगा विहिरीच्या कट्ट्यावर असे आणि रूपा तो रोज धुऊन ठेवी.

असा महिना गेला आणि एक दिवस विहिरीच्या कट्ट्यावर एक सोन्याची साखळी आणि एक छोटीशी सोनेरी पेटी रूपाला मिळाली.

''परीने माझ्यासाठीच ठेवल्या असणार ह्या वस्तू,'' रूपा आनंदाने म्हणाली.

तिने हळूच ती पेटी उघडली, तोच आतून गोड गाणं ऐकायला येऊ लागलं.

त्या आवाजाने चंदा आणि आत्या धावत आल्या. रूपाने त्यांना सगळी हकिकत सांगितली. लगेच चंदाने ती पेटी हिसकावून घेतली आणि सोन्याची साखळी आपल्या गळ्यात घातली.

तो काय गंमत! तिच्या अंगातले जुने कपडे नाहीसे होऊन त्या जागी सुंदर जरीचे कपडे आले; साखळी काढल्याबरोबर कपडे नाहीसे झाले.



''चंदाराणी,'' आत्या म्हणाली, ''आता तू ही सुंदर पेटी राजपुत्राला भेट म्हणून ने. तुझी साखळी आणि सुंदर पोषाख पाहून तो तुला नक्कीच आपली राणी करील.''

''पण आत्या,'' रूपा हळूच म्हणाली, ''ती पेटी आणि साखळी माझी आहे...''

''चूप,'' चंदा म्हणाली.

चंदा आणि आत्या लगेच राजवाड्यात निघाल्या. बिचारी रूपा डोळे पुसत पुन्हा पाणी भरायला निघाली.

तोच काय गंमत!

विहिरीच्या कठ्ड्यावर दोन पांढरे शुभ्र हातमोजे होते.

रूपा आनंदाने म्हणाली,

''माझी पेटी आणि साखळी चंदाने घेतली म्हणून परीराणीने मला हे दिले असणार.''

तिने पटकन मोजे हातात चढवले. लगेच काढले. तो काय...

मोज्यातून खळखळ करत रुपये पडले.

''अय्या! किती सुंदर भेट,'' रूपा म्हणाली. धावतच ती रस्त्यावर आली, तो तिला म्हातारी भाजीवाली भेटली.

''आजी,'' रूपा म्हणाली, ''हे घ्या पैसे. आता म्हातारपणी काम करायला नको तुम्हांला,'' असं म्हणून तिने मोजे काढले आणि बाहेर पडलेले पैसे आजीना दिले.

ती रस्त्याने पुढे चालली. भेटलेल्या प्रत्येक गरिबाला ती पैसे देत होती. सारेजण तिला दुवा देत होते.

उदार प्रेमळ रूपाला त्या मोज्यांतल्या पैशांचं स्वतःला काही घ्यावं असं वाटलंसुद्धा नाही. इतरांच्या आनंदाने तिला फार आनंद होत असे.

इकडे चंदा आणि आत्या राजपुत्राकडे पोचल्या. चंदाचं रूप आणि तिने आणलेली पेटी पाहून राजा चकित झाला.

आपल्या प्रधानजींना बोलावून तो एकीकडे म्हणाला, ''प्रधानजी, ह्या चंदाराणीचं माझ्या राजपुत्राशी लग्न करावं असं मला वाटतं.''

प्रधानजी मोठे शहाणे होते. ते म्हणाले,

''महाराज, प्रथम ही पेटी तिला कुठे मिळाली ते विचारा.''

राजाने हा प्रश्न विचारताच चंदा म्हणाली, ''महिनाभर मी एका परीचे कपडे धुवून देत होते. त्याचं हे बक्षीस आहे.''

हे खोटे शब्द तिच्या तोंडातून बाहेर पडतात न पडतात तो काय? तिच्या गळ्यातली साखळी एकदम उडून पेटीत पडली. ती पेटी उडून जमिनीवर पडली आणि सरकत निघाली.

राजा आणि प्रधान चकित होऊन पेटीच्या मागे धावले. पेटी गेली, ती सरळ रूपा गरिबांना पैसे वाटत होती तिथे पोचली. पेटी तिच्या हातात बसली आणि साखळी अलगद तिच्या गळ्यात जाऊन पडली.

त्याचबरोबर रूपाच्या अंगावर सुरेख पोषाख आला. राजा तिला पाहून चकित

झाला. त्याचबरोबर तिच्याभोवती जमलेले गरीब लोक पाहून आपल्या राज्यात इतके दुःखी लोक असावेत ह्याचं त्याला वाईट वाटलं.

तो म्हणाला,

"देवी, आपण कोण आहात? आपण माझ्या राजपुत्राशी लग्न करून सगळ्या राज्याला सुखी करण्यास मदत करा."

हे ऐकताच क्षणभर पेटीतून गाणं ऐकू आलं आणि पेटी, साखळी आणि मोजे एकदम अदृश्य झाले. आता त्यांची काही गरज उरली नव्हती.

रूपाचं राजपुत्राशी लग्न झालं आणि ते सुखाने राज्य करू लागले. साऱ्या लोकांचं त्यांच्यावर फार प्रेम जडलं. रूपाचा हेवा वाटून तिची आत्या आणि चंदा दूर निघून गेल्या.



दुकानदार ज्योतिषी कसा बनला

(एक पर्शियन लोककथा)

पर्शियामधली ही गोष्ट आहे. एका गावात एक गरीब दुकानदार राहत होता. त्या देशात घरोघरी स्नानगृहं नव्हती. शहरात ठिकठिकाणी सार्वजनिक स्नानगृहं होती. तिथे लोक इच्छा होईल तेव्हा स्नान करायला जात.

अशाच एका सार्वजनिक स्नानगृहात त्या दुकानदाराची बायको एकदा गेली. तेवढ्यात तिथे दुसरी एक बाई आपल्या दासींबरोबर आली. ती येताच स्नानगृहातील सर्व सेवक तिच्या पुढे-पुढे करून तिला मोठा मान देऊ लागले. तेवढ्यात त्या बाईने हुकूम केला की, ''मी स्नानगृहात असताना इतर कोणी बायका तिथे येता कामा नयेत.''

लगेच तिथल्या नोकरांनी इतर सर्व बायकांना निघून जायला सांगितलं.

हे पाहून दुकानदाराच्या बायकोला मोठं आश्चर्य वाटलं. तिने त्या नोकराला विचारलं,

''ह्या बाई कोण आहेत, आणि तुम्ही त्यांना इतका मान का देता?''

नोकराने सांगितलं,

''राजेसाहेबांच्या खास ज्योतिष्याच्या पत्नी आहेत त्या.''



हे ऐकताच दुकानदाराची बायको घरी आली आणि रागाने नवऱ्याला म्हणाली, ''आज माझा केवढा अपमान झाला. तुम्ही साधे भिकारडे दुकानदार! मग दुसरं काय होणार? ते काही नाही. तुम्ही राजाचे ज्योतिषी झालंच पाहिजे.''

बिचाऱ्या नवऱ्याने तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला, पण ती काही ऐकेना. शेवटी नाईलाजाने तो बिचारा पंचांग, पत्रिका मांडण्यासाठी कागद वगैरे सामान घेऊन रस्त्याच्या कडेला जाऊन बसला.

त्याच वेळी राजकन्या आपल्या दासीबरोबर स्नानगृहात गेली होती. स्नान करण्याअगोदर तिने आपल्या हातातील मौल्यवान अंगठी काढून दासीजवळ ठेवायला दिली. दासीने भिंतीला असलेल्या लहानशा झरोक्यात ती अंगठी ठेवली आणि खूण म्हणून स्वतःच्या डोक्याचा एक केस त्यात ठेवला.

थोड्या वेळाने राजकन्येचं स्नान आटोपलं आणि ती दासीकडे अंगठी मागू लागली, पण आपण अंगठी कुठे ठेवली ते दासी विसरली होती. सगळीकडे शोधूनही अंगठी सापडेना. तेव्हा दासी घाबरली आणि धावतच बाहेर आली. इतक्यात रस्त्याच्या बाजूला बसलेला ज्योतिषी बनलेला दुकानदार तिच्या नजरेला पडला. ती धावतच त्याच्याजवळ गेली आणि काकुळतीने म्हणू लागली,

''ज्योतिषी महाराज, कसंही करून तुम्ही राजकन्येची अंगठी सापडवून द्या, मी तुम्हांला मोठं बक्षीस देववीन.''



ज्योतिष्याला काय करावं ह्याची मोठी पंचाईत पडली. एकीकडे पंचागात पाहण्याचं आणि कागदावर आकडेमोड करण्याचं सोंग करून तो काय करावं ह्याचाच विचार करू लागला. तेवढ्यात सहजच त्याची नजर दासीच्या डोक्यावरच्या ओढणीकडे गेली. ओढणी एका ठिकाणी फाटली होती आणि त्यामधून दासीचे केस दिसत होते. ते पाहून ज्योतिषी सहज म्हणाला,


''एक झरोका आहे. त्यात केस आहेत.''

हे ऐकताच आपण अंगठी कुठे ठेवली होती ते दासीला आठवलं. तिने धावत जाऊन भिंतीतल्या झरोक्यातून अंगठी काढली.

दासीने ही सारी हकिकत राजकन्येला सांगितली. राजकन्येने ती राजाला सांगितली. राजाने ताबडतोब ज्योतिष्याला बोलावून घेतलं आणि आपल्या पदरी ठेवलं.

ज्योतिषी आता चांगला श्रीमंत होऊन सुखाने राहू लागला, पण हे सुख त्याला फार दिवस भोगता आलं नाही.

काही दिवसांनी राजाची तिजोरी चोरांनी फोडली आणि आतला ऐवज चोरला. राजाने चोरांचा शोध लावण्याचं काम ज्योतिष्यावर सोपवलं. ज्योतिषी घाबरला, पण त्याने राजाकडून चाळीस दिवसांची मुदत मागून घेतली.






ज्योतिषी घरी गेला आणि मोठ्या दुःखाने आणि संतापाने बायकोला म्हणाला, ''बघ, तुझ्या हट्टामुळे माझ्यावर कोणता प्रसंग ओढवलाय तो. आता चाळीस दिवसांनी माझं आयुष्य संपलं म्हणून समज. आता असं कर की, एका बरणीत चाळीस खजूर ठेव आणि रोज एक मला आणून देत जा.''

बायकोने त्याच्या सांगण्याप्रमाणे बरणीत खजूर ठेवले व त्यां दिवशी रात्री त्याला पहिला खजूर देत ती म्हणाली,

''हा पाहा पहिला.''

आता गंमत काय झाली, राजाची तिजोरी फोडणारे चोरही चाळीसच होते. राजाने चोरांचा शोध लावायची कामगिरी ज्योतिष्यावर सोपवली आहे, असं समजताच चोरांच्या नायकाने आपल्यांतला एक चोर ज्योतिष्याच्या पाळतीवर पाठवला होता. तो ज्योतिष्याच्या घराच्या छपरावर लपून बसला होता.



'हा पहा पहिला' असे ज्योतिष्याच्या बायकोचे शब्द ऐकताच तो घाबरला. त्याला वाटलं, यांना आपला पत्ता लागला. त्याने जाऊन आपल्या नायकाला सारी हकिकत सांगितली.

दुसऱ्या दिवशी दुसरा चोर छपरावर लपून बसला. रात्री नवऱ्याला खजूर देताना ज्योतिष्याची बायको म्हणाली,

''हा पहा दुसरा.''

हे चोराने ऐकलं आणि तोही घाबरला.



असे एकोणचाळीस दिवस झाले. चाळिसाव्या दिवशी चोरांचा नायक स्वतः आला.

ज्योतिष्याच्या बायकोने सर्वांत मोठा खजूर शेवटी ठेवला होता. तो आपल्या नवऱ्याला देत ती म्हणाली,

''हा शेवटचा आणि सर्वांत मोठा.''

हे ऐकताच चोरांचा नायक धावतच आत आला. ज्योतिष्याचे पाय त्याने घट्ट धरले आणि तो त्याला विनवायला लागला,

''सारा ऐवज आणून देतो, पण मला राजाच्या ताब्यात देऊ नका.''

ज्योतिष्याचं आयतंच काम झालं. त्याने सारा ऐवज दुसऱ्या दिवशी राजासमोर हजर केला. राजाने खूष होऊन त्याला मोठं बक्षीस दिलं.

पुढे एकदा काही दिवसांनी राजा जंगलात शिकारीला गेला. तिथे त्याला गवतात एक टोळ दिसला. राजा त्याला पकडण्याचा प्रयत्न करायला लागला. दोनदा टोळ निसटला, पण तिसऱ्यांदा मात्र सापडला. राजाने तो टोळ आपल्याबरोबर परत आणला आणि त्याला मुठीत ठेवून त्याने ज्योतिषाला सांगितलं, ''माझ्या मुठीत काय आहे ते ओळख.''

आता आपलं बिंग बाहेर येणार ह्या कल्पनेने ज्योतिषी घाबरला, आणि स्वतःशीच म्हणाला,

'बेट्या, पहिल्यांदा राजाच्या हातून सुटलास, दुसऱ्यांदाही वाचलास, पण आता मात्र मुठीत पक्का अडकलास. आता कुठे जाशील?'

यावरून जंगलात आपल्या हातून टोळ दोनदा सुटला हे ज्योतिष्याला कळलं अशी राजाची समजूत झाली. राजाला आश्चर्य वाटलं व खूष होऊन त्याने ज्योतिष्याला बक्षीस दिलं.

पण आता मात्र ज्योतिषी 'आपलं बिंग फुटेल की काय?' ह्या धास्तीला कंटाळला होता. त्याने असं ठरवलं की, आपण वेड्याचं सोंग घेऊन दरबारातून आपली सुटका करून घ्यायची.

त्याप्रमाणे एकदा स्नानगृहात स्नान करता करता तो तसाच उघडावाघडा बाहेर धावत आला. रस्त्याने धावत जाऊन तो राजाच्या महालात घुसला आणि राजाला उचलून घेऊन तसाच धावत बाहेर आला.

पण गंमत काय झाली की, योगायोगाने राजाचा महाल त्याच वेळी अवचित कोसळला. राजाचा जीव वाचला. ज्योतिष्याच्या अचूक ज्ञानाची आणि प्रसंगावधानाची तारीफ करून राजाने त्याला प्रमुख राजज्योतिषी नेमलं.

ज्योतिष्याची बायको आता खूष झाली. पुन्हा एकदा ती स्नानगृहात गेली असता तिथे आलेल्या जुन्या राजज्योतिष्याच्या बायकोला नोकरांकरवी घालवून देऊन तिने आपल्या पूर्वीच्या अपमानाचा सूड उगवून घेतला.



रामू आणि शामू

(रशियन लोककथा)

फार फार वर्षांपूर्वी एका गावात दोन भाऊ राहत होते. एकाचं नाव रामू आणि दुसरा शामू.

रामू श्रीमंत होता. त्याला राहायला घर होतं. गोठ्यात गुरंढोरं होती. धान्याच्या कणग्या भरल्या होत्या. रामूला मूलबाळ नव्हतं, त्यामुळे तो आणि त्याची बायको मोठ्या चैनीत राहत.

उलट शामूला सात मुलं होती. त्याला नव्हतं घर की शेत. मुलं भुकेने कळवळत, खायला मागत. पण घरात भाकरीचा तुकडासुद्धा नसे, तिथे त्यांना काय खायला देणार!

शेवटी एक दिवस मुलांचं रडणं शामूला ऐकवेना. तेव्हा तो रामूकडे गेला. म्हणाला,

''दादा, मला एक भांडंभर पीठ देशील तर फार उपकार होतील. मला जमेल तेव्हा मी ते परत करीन.''

रामू म्हणाला, ''देईन. पण भांडभर दिलं तर पोतंभर परत घेईन. पटत असेल तर घे. नाहीतर जा आणखी कुठे भीक मागायला.''

बिचारा शामू! भांडंभर पीठ घेऊन डोळे पुसत घरी निघाला पण तो घराच्या फाटकाशी पोचण्याआधीच जोरदार वारा सुटला.

धुळीचे भोवरे करत, पालापाचोळा उडवून देत वारा धावत आला आणि त्याने शामूच्या हातातल्या भांड्यातलं सारं पीठ उडवून दिलं.

शामू संतापला.

''दुष्ट वाऱ्या,'' तो म्हणाला, ''माझ्या मुलांच्या तोंडी पडलं असतं, ते पीठ उडवलंस. माझ्या मुलांना उपाशी ठेवलंस. पण थांब, मी तुला तसा सोडणार नाही.''

शामू वाऱ्याच्या मागे लागला.

वारा निघाला, शामू त्याच्या मागे धावू लागला. वारा जंगलात घुसला. शामू तिथे त्याच्या मागे गेला. वारा एका वडाच्या ढोलीत शिरला. तिथे शामूने त्याला पकडलं.

वारा म्हणाला,

''अरे गृहस्था, असा माझ्यामागे का लागला आहेस?''

शामू म्हणाला,

''मी मुलांसाठी पीठ नेत होतो ते उडवून दिलंस आणि आता वर तोंड करून विचारतो आहेस, आता मी त्यांना खायला काय देऊ?''

वारा म्हणाला,

''हात्तेच्या, एवढंच ना? ही बघ, मी तुला जादूची चादर देतो. ही टेबलावर पसर आणि हवं ते खायला मागून घे.''

शामूला आनंद झाला. वाऱ्याला दुवा देत तो घरी गेला.

घरी गेल्याबरोबर त्याने चादर पसरली आणि तो म्हणाला,

''जादूच्या चादरी, जादूच्या चादरी, काही खायला दे, काहीतरी प्यायला दे.''

त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडतात न पडतात तो काय,

ताज्या ताज्या भाकऱ्या, खमंग पिठलं.

मग भुकेचे नावच उरणार कुठलं?

शामू आणि त्याची बायको-मुलं पोटभर जेवली आणि आनंदाने स्वस्थ निजली.



दुसऱ्या दिवशी सकाळी सारेजण न्याहरी करत होती. तोच रामू तिथे आला. टेबलावर ठेवलेले तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ पाहून आश्चर्याने म्हणाला, ''अरे शामू, तू इतका श्रीमंत कधी झालास?'' यावर शामू म्हणाला,

''श्रीमंत नाही झालो. पण पोटाची काळजी मात्र मिटली. अरे खरंच, तुला पोतंभर पीठ द्यायचं आहे नाही का?''

''चादरी चादरी, जादूच्या चादरी!

मला एक पोतंभर पीठ दे बरं.''

रामूने पोतं घेतलं आणि तो घरी आला. संध्याकाळी तो शामूकडे आला आणि म्हणाला, ''अरे शामू, माझ्याकडे अवचित खूप पाहुणे आले आहेत आणि घरात तर काहीच तयारी नाही. तेवढी तुझी चादर देतोस का? काम झालं की लगेच परत करीन.''

शामूने चादर दिली.

रामूने चादरीच्या मदतीने पाहुण्यांना भरपूर जेवायला घातलं. मग त्याने ती जादूची चादर लपवून ठेवली आणि तशीच दिसणारी दुसरी एक साधी चादर घेऊन शामूकडे गेला.

म्हणाला, ''शामू ही तुझी चादर! माझी पाहुणे मंडळी जेवणावर खूष झाली बरं का!''

शामूने चादर घेतली. जरा वेळाने त्याने चादर टेबलावर पसरली आणि सारेजण जेवायला बसले.

शामू म्हणाला,

''जादूच्या चादरी, जादूच्या चादरी,

आम्हांला जेवायला पाहिजे.''

पण काहीच झालं नाही. टेबलावर अन्न आलं नाही. शामू लगेच रामूकडे गेला. म्हणाला, ''दादा, माझ्या जादूच्या चादरीचं काय केलंस?''

''वा रे वा!'' रामू म्हणाला, ''मी परत दिली नाही का तुझी चादर?''

शामू बिचारा रडत रडत घरी गेला. पुन्हा मुलांना उपास पडू लागले. शेवटी एक दिवस शामू पुन्हा रामूकडे गेला.

म्हणाला, ''दादा, मुलं उपाशी आहेत. वाटीभर पीठ तरी दे ना!''

''पीठ-बीठ नाही मिळणार'' रामू म्हणाला, ''पण काल जेली केली होती. उरलेली आहे तिथे बरीच. पाहिजे तर घेऊन जा. पुन्हा मागायला येऊ नकोस.''

शामूने जेली बशीत घेतली आणि तो निघाला. बाहेर कडक ऊन पडलं होतं. उन्हाने सगळी जेली वितळून गेली.

शामू संतापला.

''अरे दुष्ट सूर्या,'' तो म्हणाला, ''तुझी गंमत झाली पण माझ्या पोरांचा जीव गेला.''

आणि तो सूर्याच्या मागे लागला. सबंध दिवस त्याने सूर्याचा पाठलाग केला आणि संध्याकाळी डोंगराच्या मागे सूर्य मावळू लागला तिथे शामूने त्याला गाठलं.

सूर्य शामूला म्हणाला,

''अरे शामू, तू असा दिवसभर माझा पाठलाग का करतो आहेस?''

शामू म्हणाला,

‘‘मग काय करू? तू माझी जेली वितळवून टाकलीस, आता मुलांना काय खायला घालू?’’

सूर्य म्हणाला,

‘‘एवढंच ना! ही बघ मी तुला एक बकरी देतो. माझ्या कळपातली आहे बरं का ही. हिला खाऊपिऊ घाल. ती तुला दुधाऐवजी सोनं देईल.’’

बकरी घेऊन शामू आनंदाने घरी आला.


हळूहळू त्याची परिस्थिती सुधारली. बायको-मुलांना भरपूर खायला-प्यायला मिळू लागले.

लवकरच ही सारी हकिकत रामूच्या कानी गेली. तो लगेच शामूकडे गेला आणि म्हणाला, ‘‘अरे शामू, तुझी बकरी मला एक तासभर देतोस का? मला एका माणसाचे पैसे परत द्यायचे आहेत आणि माझ्याकडे तर एक पैसाही नाही.’’

शामू म्हणाला, ‘‘घे बकरी. पण पुन्हा मला फसवू मात्र नकोस हं!’’

‘‘छे रे, आत्ता आणून देतो बघ,’’ असं म्हणून रामू बकरी घेऊन गेला आणि त्याने बकरीचं दूध काढलं. जेव्हा भरपूर सोनं मिळालं तेव्हा त्याने ती बकरी लपवून ठेवली आणि दुसरीच एक बकरी शामूला नेऊन दिली.

संध्याकाळी शामू बकरीचं दूध काढू लागला तो काय, बकरी सोनं देईना. शामू धावतच रामूकडे गेला. पण रामू त्याचं काही ऐकूनच घेईना.



''मी तुझी बकरी परत दिली. जास्त काही तू बोलूच नकोस,'' तो म्हणाला.

शामू बिचारा रडतच घरी गेला. काही दिवस गेले. घरातलं सोनं संपलं. मुलं भुकेने कळवळली. तेव्हा शामू रामूकडे गेला. म्हणाला,

''दादा, मुलं भुकेनं रडताहेत रे, थोडंसं पीठ देतोस का?''

रामू म्हणाला,

''पीठ नाही बाबा. पण कालचं सूप उरलं आहे पातेलीभर. पाहिजे तर घेऊन जा.''

शामू सूप घेऊन निघाला. आता थंडी सुरू झाली होती. बर्फ पडू लागलं आणि सगळं सूप गोठून गेलं.

शामू रागवला,

''अरे दुष्ट बर्फा,'' तो म्हणाला, ''माझ्या मुलांचं सूप गोठवून टाकलंस काय? थांब तुला शिक्षा करतो.''

शामू बर्फाच्या मागे लागला. बर्फ जंगलात शिरलं. तिथे शामूने त्याला गाठलं.

बर्फानं विचारलं,

''शामू, तू माझ्या मागे का लागला आहेस?''

शामू म्हणाला,

''तू माझं सारं सूप गोठवून टाकलंस. आता माझी मुलं उपाशी राहतील. माझ्या दादानं माझी जादूची चादर आणि सोनं देणारी बकरीही नेली. आता मी काय करू?''

बर्फ म्हणालं, ''एवढंच ना! हे बघ मी तुला एक पोतं देतो. तू म्हणालास, 'चला बाहेर या दोघे!' की दोघे बाहेर येतील. 'आत जा दोघे' म्हंटलंस की आत जातील.''

शामू पोतं घेऊन घरी आला आणि म्हणाला, ''चला बाहेर या दोघे!''

त्याबरोबर पोत्यातून दोन जाडजूड सोटे बाहेर आले आणि शामूला बडवू लागले, आणि म्हणाले, ''अजून तरी शहाणा हो. रामूच्या लुच्चेपणाने फसू नकोस.''

''आत जा दोघे,'' असं कसंबसं शामू म्हणाला, तेव्हाच ते थांबले. शामूला मार मात्र भरपूर खावा लागला.

संध्याकाळी रामू आला.

म्हणाला, ''शामू, कुठे रे गेला होतास दिवसभर, काही नवीन वस्तू आणली आहेस की नाही?''

शामू म्हणाला,

''हो तर, हे जादूचं पोतं आणलं आहे. आपण फक्त म्हणायचं बाहेर या दोघे, की दोघेजण येऊन सगळं काम करून टाकतात.''

रामू म्हणाला,

''अरे वा शामू! मला दे ना तुझं पोतं एक दिवस. माझं छप्पर शाकारायचं आहे तेवढं करून घेईन.''

''घे की,'' शामू म्हणाला.

रामू पोतं घेऊन घरी आला. म्हणाला, ''बाहेर या दोघे!''

त्याबरोबर दोन जाडजूड सोटे बाहेर येऊन त्याला बडवू लागले. ते म्हणाले, ''शामूची

सोनं देणारी बकरी आणि जादूची चादर चोरलीस, ती परत दे लवकर.''

रामू घाबरून शामूच्या घराकडे धावत सुटला. 'शामू वाचव रे मला' असे रडू ओरडू लागला.

सोटे त्याला मारत मारत त्याच्या मागे लागले.

शामू नजरेस पडताच रामू ओरडला, ''शामू, धाव. तुझ्या साऱ्या वस्तू परत देतो.''

''आत जा दोघे,'' शामू ओरडला. लगेच सोटे परत पोत्यात गेले.

रामू लंगडत लंगडत घरी गेला आणि जादूची चादर आणि सोनं देणारी बकरी त्याने शामूला परत दिली.


शामू आता सुखात राहू लागला. जादूच्या चादरीमुळे आणि बकरीने दिलेल्या सोन्यामुळे त्याला कधी काही कमी पडलं नाही.



चोरांचा सरदार

(आयरिश लोककथा)

फार वर्षांपूर्वीची गोष्ट. एका गावात एक गरीब शेतकरी राहत होता. त्याला तीन मुलगे होते. मुलगे मोठे झाले आणि त्यांनी आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी दूरदेशी जाण्याचं ठरवलं. थोरले दोघे मुलगे उद्योगी आणि शहाणे होते, पण धाकटा मात्र उनाडच होता. रानावनात भटकून ससे पकडणं, तऱ्हेतऱ्हेच्या गंमती करून सर्वांना हसवणं असे उद्योग करण्यात त्याला गोडी वाटे.



तिघे मुलगे प्रवासाला निघाले. एके ठिकाणी तीन रस्ते फुटले होते. तिघांनी वेगवेगळ्या रस्त्यांनी जायचं असं ठरवलं. अजिबात ये-जा नसलेला ओसाड रस्ता धाकट्या मानाजीने पसंत केला. दोघा भावांचा निरोप घेऊन तो निघाला. वाटेतच त्याला पावसाने गाठलं आणि रात्र पडेतो मानाजी अगदी थकून गेला. तेवढ्यात त्याला रस्त्याच्या कडेला एक लहानसं घर दिसलं.

त्याने दारावर टक-टक केलं. एका म्हाताऱ्या बाईने दार उघडलं.

''कोण रे तू? काय पाहिजे?'' तिने विचारलं.

''पोटाला थोडी भाकरी आणि झोपायला जागा,'' मानाजी उत्तरला.

''इथं नाही तुझी सोय होणार,'' म्हातारी म्हणाली.

''ती का?'' मानाजीने विचारले.

''ह्या घरात सहाजण राहतात, पहाटे तीन-चारपर्यंत कामावरून येतील. तुला त्यांनी इथे पाहिलं, तर जीवच घेतील तुझा.''

''काही हरकत नाही,'' मानाजी म्हणाला, ''नाही तरी गारठ्यानं आणि भुकेनं बाहेर माझा जीव जाणारच. चल म्हातारे, काहीतरी खायला दे मला.''

म्हातारी घाबरली आणि तिने त्याला जेवायला वाढलं. मानाजी भरपूर जेवला. झोपताना त्याने म्हातारीला बजावलं, ''म्हातारे, कोणी माझी झोप मोडलेली मला खपायची नाही हं.'' आणि तो स्वस्थ झोपला.

सकाळी मानाजी जागा झाला तो सहा राकट माणसं त्याच्याभोवती जमली होती. ते चोर होते. त्याने त्यांच्याकडे तुच्छतेने पाहिलं आणि तो अर्धवट उठला.

''कोण रे तू?'' त्या सहाजणांच्या नायकाने विचारलं, ''कशासाठी आला आहेस?''

''चोरांचा सरदार आहे मी. मदतनीस शोधायला निघालोय. तुम्ही लायक आढळलात तर तुम्हांलाही चार धडे देईन,'' मानाजी म्हणाला.

त्याची ती ऐट पाहून चोरांचा नायक जरा बिचकला.

''बरं बरं,'' तो उसन्या अवसानात बोलला आणि म्हणाला, ''ऊठ आधी. न्याहारी कर. मग पाहू आपण.''




न्याहारी आटोपली. तोच दारावरून एक धनगर एक चांगला गलेलठ्ठ बोकड घेऊन चाललेला दिसला.

चोरांचा नायक सर्वांकडे वळला आणि विचारायला लागला,

''इथून पुढे थोडी झाडी लागते. त्या झाडीतून हा धनगर बाहेर पडायच्या आत त्याच्याजवळचा बोकड चोरू शकेल तुमच्यापैकी कोणी? पण दंगामस्तीशिवाय युक्तीने काम झालं पाहिजे.''

त्याच्या कंपूतल्या पाचही जणांनी माना हलवल्या,

''छे बुवा, आपल्याला नाही जमणार,'' ते म्हणाले.



“मी आहे ना पण, चोरांचा सरदार. मी सहज करीन हे काम,” मानाजी म्हणाला.

लपतछपत मानाजी रस्त्याच्या एका वळणापाशी गेला. आपला उजवा जोडा त्याने रस्त्याच्या मधोमध ठेवला. मग तो तसाच पुढे गेला. त्याने पुढच्या वळणावर आपला डावा जोडा ठेवला. नंतर तो लपून बसला.

बोकड घेऊन धनगर पहिल्या वळणावरच्या जोड्यापाशी आला. जोडा पाहिल्यावर तो मनाशी म्हणाला, ‘दुसरा जोडा हवा होता. म्हणजे छान जोड झाला असता.’

धनगर तसाच पुढे गेला आणि पुढच्या वळणावर त्याला दुसरा जोडा दिसला,

“अरे अरे,” दुःखाने तो म्हणाला, “पहिला जोडा उचलला असता तर!”

त्याने आपला बोकड तिथेच एका झाडाला बांधून ठेवला आणि पहिला जोडा आणण्यासाठी तो परत फिरला. मानाजी तिथेच एका झाडामागे लपला होता! धनगर नजरेआड झाल्यावर त्याने चटकन जोडा उचलला आणि बोकडाची दोरी सोडून त्याला घेऊन तो पळाला.

इकडे धनगर मागच्या वळणाशी जाऊन पोचला तो तिथे पहिला जोडा नाही. फिरून दुसऱ्या वळणाशी येतो तो काय! हा जोडाही नाही आणि बोकडही नाही.

धनगर चकित झाला. कपाळाला हात लावून तो म्हणाला,

“आता मात्र हद्द झाली. बायकोला हे कळलं तर जन्मभर थट्टा करायला विषय मिळेल तिला. आता गुपचूप घरी जाऊन दुसरा एखादा प्राणी बाजारात विकायला न्यावा.”

धनगर परत घरी गेला आणि मानाजी मोठ्या ऐटीत त्या सहा चोरांकडे गेला.



जरा वेळाने धनगर एक मेंढा घेऊन त्याच रस्त्याने बाजाराला जायला निघाला.

''काहीही दंगामस्ती न करता हा मेंढा चोरायचा आहे. आहे कुणाची हिंमत?'' मानाजीने विचारलं.

कोणीच तयार होईना. तेव्हा मानाजीच म्हणाला,

''मी सहज करीन हे काम. मला फक्त एक दोरी पाहिजे.''

धनगर मेंढ्याला घेऊन रस्त्याने चालला होता. अवचित एका झाडाला एक प्रेत लटकत असलेलं त्याला दिसलं.

''अरेच्या! मी मगाशी इथून गेलो तेव्हा इथे प्रेत नव्हतं,'' तो आश्चर्याने म्हणाला.

आणखी पुढे जातो तो आणखी एक प्रेत दिसलं. ''मला काही भास-बिस होतायत की काय!'' डोळे चोळून नीट बघत धनगर म्हणाला.

आणखी पुढे जातो तो त्याला आणखी एक प्रेत दिसलं.

''आता मात्र कमाल झाली,'' धनगर म्हणाला.

''मला वेड तर नाही ना लागलं! आता आधी परत जाऊन ती पहिली प्रेतं आहेत की नाहीत ते बघून येतो.''

त्याने मेंढा एका झाडाला बांधला आणि तो प्रेतं पाहण्यासाठी परत गेला.

त्याची पाठ वळल्याबरोबर मानाजीने प्रेत उतरवून घेतलं, मेंढ्याची दोरी सोडली आणि मेंढ्याला घेऊन तो चोरांच्या झोपडीकडे गेला.

प्रेतं नाहीशी झालेली पाहून धनगर परत येतो तो काय, मेंढाही नाहीसा झालेला.

''अरे देवा, बायको आता काय म्हणेल? तिच्या नकळत आता एखादा बैल विकायला न्यायला पाहिजे,'' असा विचार करून धनगर घरी गेला.

मेंढ्याला घेऊन येणाऱ्या मानाजीला पाहून चोरांचा नायक आणि त्याचे पाच साथीदार चकित झाले. तोच बैल हाकत बाजाराला निघालेला धनगर त्यांना दिसला.

''आता ह्या धनगराला फसवून बैल कोण पळवेल?'' मानाजीने विचारलं.

कोणीच तयार होईना. तेव्हा मानाजी स्वतःच निघाला.

धनगर बैलाला घेऊन चालत होता तोच त्याला झाडीतून बोकडाचा आणि मेंढ्याचा 'बें बें' आवाज ऐकू आला.

''अरे,'' तो लक्षपूर्वक ऐकत म्हणाला, ''हा नक्की माझ्याच बोकडाचा, आणि माझ्याच मेंढ्याचा आवाज वाटतोय हा.''

आपला बैल एका झाडाला बांधून धनगर झाडीत शिरला. शोधत शोधत बराच आतवर गेला, पण तेवढ्यात आवाज थांबला. बराच शोध करून तो निराश होऊन परत आला, तो बैल नाहीसा झालेला.

बैल घेऊन येणाऱ्या मानाजीला पाहून ते सहा चोर थक्क झाले. त्यांनी आपली हार मानून मानाजीला आपला नायक केला.

सात-आठ दिवस गेले. मग एक दिवस ते चोर मानाजीला म्हणाले,

''शेजारच्या गावात जत्रा भरली आहे. खूपं दिवसांत कुठे गेलो नाही. आम्ही जरा भटकून येतो.''

ते सहाजण जत्रेला गेल्यावर मानाजी म्हाताऱ्या स्वयंपाकिणीला म्हणाला,

''म्हातारे, तू या लोकांची इतकी वर्षं सेवा केलीस, त्याबद्दल त्यांनी तुला काही बक्षीस दिलं असेल नाही का?''

''कपाळाचं बक्षीस! नुसती राबत्येय इतकी वर्षं!'' म्हातारी कुरकुरली.

''चल मी देतो तुला बक्षीस,'' असं म्हणून मानाजी म्हातारीला चोरांच्या खजिन्याच्या गुहेत घेऊन गेला.

ती चकित होऊन सारा खजिना पाहत आहे, तोवर मानाजीने पिशवीभर सोनं घेतलं, नाण्यांनी खिसे भरले आणि चटकन बाहेर येऊन दार लावून टाकलं. म्हातारी अडकली.

परत येऊन मानाजीने उत्तम पोषाख केला. नंतर त्याने बोकड, मेंढा आणि बैल सोडले आणि त्यांना हाकलत हाकलत तो धनगराच्या घरी गेला. आपली जनावरं पाहून धनगराला फार आनंद झाला.

''धनगरबाबा, ही जनावरं तुमची आहेत का?'' मानाजीने विचारलं.

''होय रे बाबा होय. माझीच आहेत ती.''

''मला रानात सापडली. त्या बोकडाच्या गळ्यात दहा रुपयांचा बटवा पण आहे.''

''ते पैसे नाहीत माझे.''

''असू द्या. तुम्हांलाच घ्या ठेवून,'' मानाजी म्हणाला.

''देव तुझं भलं करील बाबा,'' धनगर आनंदून बोलला.

तिथून मानाजी निघाला तो आपल्या वडलांच्या घरी परत गेला. प्रथम त्याला त्याच्या आईवडिलांनी ओळखलंच नाही. पण हळूहळू त्याने आपली सारी हकिकत सांगितली. त्यांना समाधान वाटलं.

दुसऱ्या दिवशी मानाजी आपल्या वडलांना म्हणाला,

''बाबा, मला जमीनदाराच्या मुलीशी लग्न करायचंय. तुम्ही त्याच्याकडे जाऊन त्याच्या मुलीला माझ्यासाठी मागणी घाला.''

''वेड्या,'' मानाजीचे वडील म्हणाले, ''जमीनदार मला दाराशी तरी उभा करेल का?''

''त्याला सांगा की मी चोरांचा सरदार आहे. माझ्याशी बरोबरी करू शकेल असा जगात कोणी नाही,'' मानाजी म्हणाला.

नाईलाजाने मानाजीचे वडील गेले. दोन तासांनी ते परत आले. म्हणाले,

''मानाजी, जमीनदार म्हणाले की येत्या रविवारी त्यांच्या स्वयंपाकघरात शिजणारी कोंबडी पळवून दाखव आणि मग मुलीला मागणी घालायला ये.''

रविवारी दुपारी जमीनदाराच्या स्वयंपाक-घरात कोंबडी विस्तवावर भाजली जात होती.

स्वतः जमीनदार आणि त्याचे नोकर भोवती बसले होते. एवढ्यात स्वयंपाकघराचं दार उघडलं आणि पाठीवर मोठं पोतं घेतलेला एक म्हातारा आत डोकावला,

"बाईसाहेब, काही उरलं सुरलं द्या गरिबाला," तो म्हणाला.

"अरे, अजून जेवणं व्हायची आहेत. पुढल्या ओटीवर बस."

भिकारी ओटीवर बसला.

जरा वेळाने खिडकीशी उभा असलेला नोकर एकदम ओरडला, "अरे, अंगणात ससा दिसतोय. पकडू या का त्याला?"



"अरे चल, असा काय ससा सापडतोय!" दुसरा म्हणाला.

तो ससा बाजूच्या कुंपणात पळाला. मानाजीने आणखी एक ससा सोडला. तो ससा पाहून नोकर पुन्हा म्हणाला, "सहज सापडेल. अजून अंगणात आहे बघ."

तेवढ्यात तो ससा पळाला. पण मानाजीने आणखी एक ससा सोडला.

आता मात्र खिडकीतून पाहणारे जमीनदाराचे नोकर अधीर झाले.

"मालक पुढलं दार तर बंद आहे. सशाला पकडायला जाऊ का आम्ही? मानाजीराव बंद दारातून थोडेच येणार आहेत!"

जमीनदार नको म्हणत होता, पण त्याचं ऐकायला कोणी तयार नव्हतं. दार उघडून सारेजण भराभर बाहेर पडले. पाठोपाठ जमीनदारही बाहेर पडला.

"कोंबडीकडे बघू का जरा महाराज? नाहीतर जळेल ती," म्हाताऱ्याने विचारलं.

"बघ," जमीनदार म्हणाला, "पण दुसऱ्या कोणाला आत येऊ देऊ नकोस हं."

मानाजीने सोडलेला तिसरा ससाही पळून गेल्यामुळे सारे नोकर जरा वेळाने आत येतात तो तिथे म्हातारा, भिकारीही नाही आणि कोंबडीही नाही.

जमीनदार मानाजीवर चडफडू लागला, तोच मानाजीच्या घरून जमीनदाराला आपल्या बायको-मुलीसह जेवणाचं आमंत्रण आलं. जमीनदाराने आमंत्रण स्वीकारलं. जेवणाचा थाट सुरेखच होता. जमीनदाराच्या स्वयंपाकघरात नुकतीच भाजलेली कोंबडीही जेवणात होती. मानाजीच्या हुषारीचं जमीनदाराला कौतुक वाटलं आणि त्याची मुलगी मानाजीच्या ऐटबाज पोषाखावर आणि गोड बोलण्यावर खूष झाली.

जेवण आटोपल्यावर जमीनदार मानाजीला म्हणाला,

''मानाजी, माझ्या मुलीशी लग्न करायचं असेल तर मी आणखी एकदा तुझी परीक्षा घेणार. उद्या रात्री माझ्या तबेल्यातले सहा घोडे सहा पहारेकऱ्यांची नजर चुकवून तू चोरले पाहिजेस.''

मानाजीने ताबडतोब होकार दिला.

दुसऱ्या दिवशी रात्री तबेल्यात बांधलेल्या सहा घोड्यांवर सहा पहारेकरी बसून वेळ घालवत होते. पण मध्यरात्रीनंतर थंडी वाढली. पहारेकरी काकडून गेले. तेवढ्यात एक म्हातारी बाई एक मोठी थोरली पिशवी घेऊन कुडकुडत आली आणि रात्री तबेल्याच्या एका कोपऱ्यात झोपण्याची परवानगी मागू लागली. पहारेकऱ्यांनी तिला परवानगी दिली. जरा वेळाने तिने पिशवीतून एक दारूची बाटली काढली. एक घोट घेऊन मिटक्या मारीत ती म्हणाली, ''पहारेकरीसाहेब, गरिबाकडला नमुना बघता का थोडा?''

पहारेकरी आनंदाने तयार झाले आणि थोड्याच वेळात म्हातारीची बाटली भराभर संपली. म्हातारीने दारूत झोपेचं थोडं औषध मिसळलं होतं. त्यामुळे सारे पहारेकरी घोड्यावर बसल्या बसल्या गाढ झोपले.

म्हातारीने साऱ्यांना घोड्यावरून उचलून बाजूला ठेवलं आणि ती हळूच घोड्यांना घेऊन गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी एका घोड्यावर बसून आणि बाकीच्या घोड्यांना घेऊन मानाजी जमीनदारासमोर हजर झाला.

त्याला पाहून जमीनदार चकित झाला. पण पुन्हा विचार करून तो म्हणाला,

''त्या मूर्खांना फसवणं मोठंसं कठीण नाही. आता उद्या दुपारी एक ते तीन वाजेपर्यंत मी स्वतः एका घोड्यावरून रपेट करीन. तू जर तो घोडा पळवलास तर तू खरा हुषार.''

दुसऱ्या दिवशी जमीनदाराने घोड्यावरून बरीच रपेट केली. पण मानाजीचा पत्ताच नव्हता. शेवटी कंटाळून तो घरी निघाला.

तेवढ्यात त्याचा एक नोकर धावत येताना दिसला.

''मालक, मालक,'' तो ओरडत होता. ''ताबडतोब घरी चला. मालकीणबाई

जिन्यावरून गडगडत खाली पडल्या. त्यांची मान मोडल्यासारखी वाटते आहे. लवकर घरी गेलात तर कदाचित गाठ पडेल. चला, चला.''

''अरे गाढवा,'' घोड्यावरून उडी टाकून जमीनदार ओरडला, ''ह्या घोड्यावरून जा आणि लवकर वैद्यराजांना घेऊन ये.''

नोकराने घोड्यावर टांग टाकली. जमीनदार धावतच घरी गेला. पाहतो तो बायको घरी सुखरूप होती.

ती आश्चर्याने म्हणाली,

''अगबाई, असे काय आलात धावत? आणि घोडा कुठे आहे?''

''अग, पण तू पडलीस ना जिन्यावरून? काय झालं?''

पण तेवढ्यात त्याचा घोडा रिकामाच परत येताना दिसला आणि जमीनदाराच्या लक्षात मानाजीची युक्ती आली. नोकर मानाजीने दिलेली बक्षिसी घेऊन पळाला होता.

दुसऱ्या दिवशी मानाजी येताच जमीनदार रागाने म्हणाला,

''मानाजी, कालची तुझी युक्ती मला मुळीच पसंत पडली नाही. अरे गृहस्था, किती घाबरवून टाकलंस मला! आता तुझी शेवटची परीक्षा आज रात्री घेणार. जर तू आमच्या अंथरुणावरली चादर आज रात्री पळवलीस, तर मुलगी तुला दिली असं समज.''

मानाजी म्हणाला, ''ठीक आहे, पण आता मुलगी दिली नाहीत तर मात्र तिलाच पळवून नेईन!''

त्या रात्री त्याची बायको अंथरुणावर पडली. तेवढ्यात खिडकीतून कोणीतरी डोकावताना दिसलं.

''तो पाहा मानाजी,'' जमीनदार म्हणाला, ''आता चांगली जिरवतो त्याची.''

आणि त्याने चटकन बंदूक उचलून नेम धरला.

''अगंबाई, बापड्याचा खून करता की काय?'' जमीनदारीणबाई म्हणाल्या.

''नाही गं. नुसती गंमत,'' असं म्हणून जमीनदाराने बंदूक झाडली.

धप्पकन काहीतरी पडल्याचा आवाज आला.

''अरे देवा. मेला बिचारा. काय केलंत हे?'' जमीनदारीणबाई घाबरून म्हणाल्या.

''छेः छेः शक्यच नाही,'' असं म्हणत जमीनदार खाली धावला. दार तसंच उघडं टाकून अंगणात गेला.

जरा वेळाने जमीनदाराच्या बायकोला आपल्या नवऱ्याचा आवाज ऐकू आला,

''अगं, लवकर चादर दे. मानाजी मेलेला नाही. पण खूप रक्त येत आहे. घट्ट बांधायला पाहिजे.''

बायकोने चटकन चादर बाहेर फेकली, पण तिथे जमीनदार नसून मानाजी होता. चादर हातात पडताच तो चटकन पळाला.

इकडे जमीनदार चडफडत परत आला.

''बदमाष लेकाचा, नुसता पेंढा भरलेलं बुजगावणं दाखवत होता खिडकीतून.''

''मग चादर कशाला मागितलीत?'' बायकोने विचारलं.

''चादर? कोणी मागितली चादर?'' जमीनदाराने उलटं विचारलं.

''तुम्ही, आणि मी ती खिडकीतून टाकली.''

''आता मात्र कमाल झाली,'' तो म्हणाला, ''मानाजी, आपण हार मानली बुवा तुमच्यापुढे! चला, आता उद्याच लग्नाचा मुहूर्त ठरवू.''

मग दुसऱ्या दिवशी मानाजीराव जमीनदारांचे जावई झाले. अगदी लाडके जावई! आणि मग मात्र जावईबापूंचे किती कौतुक करू आणि किती नको असं जमीनदाराला झालं.




अदृश्य करणारा कडब्याचा कोट

(जपानी परीकथा)

जपानमधल्या एका छोट्याशा खेड्यातली गोष्ट आहे ही. ह्या छोट्याशा खेड्यात एक उनाड माणूस राहत होता. त्याचं नाव ओटोको सान. सान म्हणजे जपानी भाषेत श्रीयुत, श्रीमती किंवा कुमारी. तर हा ओटोको सान मोठा खोडकर होता. काही ना काही खोड्या करून सर्वांना त्रास द्यायचा, हाच त्याचा उद्योग.

एक दिवस ओटोको एक बांबू घेऊन त्याची नळी बनवत बसला होता. आधी त्याचा बेत होता की, ह्या नळीतून खडे मारायचे. पण मग त्याला वाटू लागलं की, दुर्बीण म्हणून ह्या नळीचा चांगला उपयोग होईल. त्याने लगेच नळी डोळ्याला लावली आणि तिच्यातून तो बघू लागला.



तेवढ्यात एक तेंगू उडत उडत तिथे आला.

तेंगू म्हणजे एक प्रकारचा परी-माणूस. त्याचं नाक लांब असतं, त्याला पंख असतात. त्याच्या डोक्यावर एक काळी टोपी असते, आणि त्याला जादूही येते.

आता खरं म्हणजे शहाण्या माणसाने तेंगूच्या वाटेला जाऊ नये. पण ओटोकोने मात्र ह्या तेंगूची खोडी काढायची असं ठरवलं.

झालं! ओटोकोने ठरवलं की, ह्या तेंगूला फसवायचं आणि त्याच्या अंगातला कोट मिळवायचा.

लगेच तो दुर्बिणीतून फार मोठी गंमत दिसत असल्यासारखं दाखवू लागला.

तेंगूलाही तो काय पाहतो आहे ह्याची उत्सुकता वाटली आणि तो जवळ येऊन म्हणाला,

''काय रे बघतोयस? मला बघू दे की!''

''माझी नवी दुर्बीण तुला देऊ?'' ओटोको मोठ्या ताठ्यात म्हणाला, ''वा रे वा! बघ, चंद्र काय स्पष्ट दिसतोय ह्यातून!''

''दे की रे,'' तेंगू म्हणाला, ''माझी हॅट आणि बूट देईन मी तुला.''

''हॅट!'' असं म्हणून ओटोको दुर्बिणीतून बघतच राहिला.

''मग हा कोट देऊ का माझा?''

ओटोकोला कोट हवाच होता. त्याने दुर्बीण तेंगूला देऊन टाकली आणि कोट घेऊन पळ काढला.

बिचारा तेंगू दुर्बिणीतून पाहू लागला, तो काहीच दिसेना! कुठला चंद्र आणि कुठलं काय!

जरा दूर गेल्यावर ओटोको सानने कोट अंगात घातला आणि काय नवल? तो एकदम अदृश्य झाला! ओटोकोच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

तो रस्त्यातून मजेत धावत सुटला. लोकांच्या पायात पाय अडकवून त्यांना पाडावं. कोणाचं नाकच ओढावं तर कोणा फेरी-वाल्याची टोपलीच पाडावी! मजाच मजा!!

बिचारे रस्त्यातले लोक अगदी चकित होऊन गेले. दिसत तर कोणीच नाही, आणि हे काय प्रकार होताहेत तेच त्यांना कळेना.

तेवढ्यात तिथून एक मोठा सरदार जाताना दिसला. ओटोकोने पटकन त्याचा डावा कान ओढला. तो रागाने मागे वळून पाहू लागला. तेवढ्यात ओटोकोने त्याचा उजवा कान धरून त्याला गर्रकन गोल फिरवला. तो धपकन रस्त्यात पडला. ही गंमत पाहून लोक पोट धरून हसू लागले. सरदार खूप चिडला, पण करतो काय! तिथे तर कोणीच दिसे ना.

ओटोको पुढे चाललाच होता. हातमोजे घालून चाललेल्या एका माणसाचे मोजे त्याने पळवले, एका मुलीची छत्री पळवली आणि दोन्ही गोष्टी रस्त्यांच्या कडेला गटारात टाकून दिल्या. मग एका कोळणीच्या टोपलीतले मासे पळवून तो घेऊन जाऊ लागला. उडत जाणारे मासे पाहून लोक धावले, पण मासे उडत उडत त्यांच्या पायांवरच पडू लागले.

अशी खूप मजा केल्यावर ओटोको घरी गेला. हळूच दाराआड लपून त्याने आपला कोट काढला. दारातून कोणी आलं नसताना ओटोका खोलीत आल्याचं पाहून ओटोकोची आई बिचारी चकित झाली. तिला काहीच न सांगता ओटोको जेवण आटपून स्वस्थ निजला.

आई आपलं काम आटपून घर आवरू लागली तेव्हा तिला दारामागे कडब्याचा विणलेला तो कोट सापडला.


''अरे रामा, कसला घाणेरडा कोट हा!'' चिमटीत कोट उचलत आई म्हणाली, ''ओटोको उठायच्या आत जाळूनच टाकते.''

आईने तो कोट चुलीत टाकला.

जरा वेळाने ओटोको उठला आणि कोट शोधू लागला पण कोट काही सापडेना. ओटोको भयंकर चिडला आणि कोट जाळल्याचं आईने सांगितल्यावर तर... अरे बापरे! त्याने थैमानच घातलं.

आरडाओरडा करून दमल्यावर ओटोको चुलीकडे जाऊन पाहू लागला. कोटाची राख अजून चुलीतच होती. ओटोकोला वाटलं, कदाचित अजूनही त्या राखेत थोडी जादू शिल्लक असेल.

त्याने ती सगळी राख गोळा केली. मग बागेच्या एका कोपऱ्यात जाऊन त्याने आपले कपडे काढून टाकले आणि राख आपल्या अंगाला चोपडली.



आणि काय नवल? लगेच तो अदृश्य झाला! ओटोको खूष झाला आणि पुन्हा काहीतरी गंमत करायची असं ठरवून बाजारात गेला.

बाजारातल्या दारूच्या दुकानातून सुरेख वास सुटला होता. ओटोकोने वास ओळखला. स्ताके-नावाच्या, भातापासून बनवलेल्या दारूचा तो वास होता.

ओटोको दुकानात शिरला आणि दारूच्या पिंपाजवळ जाऊन नळाला तोंड लावून दारू पिऊ लागला.

कसला आवाज होतोय म्हणून सारेजण पाहू लागले. तो गंमतच दिसली.

दारूच्या पिंपाचा नळ उघडा; पण उगीच बारीक धारेने दारू गळतेय आणि एक लहानसं कुत्रं ती प्यायला येतंय.



दुकानाचा मालक कुत्र्याला हाकून नळ बंद करण्यासाठी उठला. तेवढ्यात नळाजवळ ओठांची एक जोडी दिसू लागली. मग जरा वेळाने ओठांभोवतीचा भाग, नाक आणि डोळे पण दिसू लागले आणि गळणाऱ्या दारूजवळ जमिनीवर ठेवलेले दोन हात दिसू लागले.

मालकाने घाबरून ज़ोरात किंकाळी फोडली. त्याबरोबर दोन लालसर डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिलं आणि एक चेहरा आणि दोन हात बाहेर पळत सुटले.

गंमत काय झाली होती, त्या कोटाची राख कोरडी होती तोवर तिच्यात जादू होती. पण ती ओली झाल्याबरोबर तिची जादू नाहीशी झाली.

नुसता चेहरा आणि हात दिसत असलेला ओटोको पुढे पळत होता आणि 'पकडा पकडा!' असं ओरडत लोक त्याच्या मागे लागले होते.

आता ओटोको दमला होता. घामाने भिजला होता. जशी जशी त्याच्या अंगावरची राख ओली होऊ लागली तशी तशी त्याची कातडी मधून मधून दिसू लागली. शेवटी धावत धावत तो नदीपाशी आला आणि त्याने पाण्यात उडी टाकली. चोळून चोळून अंगावरची सगळी राख धुऊन टाकली आणि पूर्वीसारखा दिसू लागल्यावर ओटोको कुडकुडत बाहेर आला.

एका माणसाने दयाळूपणाने त्याच्या अंगावर एक किमोनो टाकला.


सगळे लोक त्याच्याभोवती जमले. हसून त्याची थट्टा करू लागले. काय प्रकार आहे त्याची चौकशी करू लागले.

ओटोकोने शरमेने खाली मान घातली आणि हळूहळू सगळी हकिकत सांगितली.

लोक हसून म्हणाले,


''भले बहाद्दर! तेंगूला फसवायला पाहत होता शहाणा. चांगली फजिती झाली,''

ओटोको-सानच्या खोडकर स्वभावात ह्यानंतर काही सुधारणा झाली की नाही, ते मात्र माहीत नाही.



कावळा, कोकीळ आणि घुबड

(ब्रह्मी लोककथा)



एक होतं जंगल. त्या जंगलात एक दिवस एक मुलगा आपली गलोल घेऊन आला आणि खडे गोळा करून नेम मारण्याचा खेळ खेळू लागला. एक खडा त्याने नेम धरून मारला तो लागला एका घुबडाला.

खडा लागल्यामुळे घुबडाला दुखू लागले. ते आपल्या मित्राकडे, कावळ्याकडे गेलं आणि आपल्याला लागलं असल्याचं सांगू लागलं.

कावळा म्हणाला,

''अरे! बरंच लागलेलं दिसतंय रे तुला. चल, आपण डॉक्टर कोकीळकडे जाऊ.''

डॉक्टर कोकीळ हे जंगलातल्या पक्ष्यांचा प्रख्यात डॉक्टर होते. कावळा घुबडाला त्यांच्याकडे घेऊन गेला. डॉक्टर कोकीळने घुबडाला तपासलं, तेव्हा एक मातीचा खडा घुबडाच्या अंगात रुतून बसलेला त्याला आढळला.

डॉक्टर कोकीळ म्हणाले,

''घुबडाच्या दुखण्याचं निदान मी केलं आहे, पण माझी फी मात्र आगाऊ द्यायला हवी.'

डॉक्टर कोकीळांच्या या म्हणण्यामागेही कारण होतं. जंगलातल्या पक्ष्यांमध्ये घुबड एक नंबर लबाड म्हणून प्रसिद्ध होतं.

डॉक्टर कोकीळांचं बोलणं ऐकल्यावर घुबड कण्हत कण्हत म्हणालं,

''डॉक्टर फार दुखतं आहे हो. अगोदर औषध द्या ना!'' कावळ्याला आपल्या मित्राची दया आली.

तो म्हणाला,

''डॉक्टरसाहेब, घुबड तुमची फी देईल ह्याची हमी मी देतो. पण तुम्ही अगोदर औषध द्या.''

डॉक्टर कोकीळ म्हणाले,

''ठीक आहे. एक तळं नाहीतर पाणी असलेला खड्डा शोधा आणि रोग्याला तीन-चार तास त्यात बसवा. म्हणजे बरं वाटेल.''

कावळा लगेच उडाला आणि घुबडाला आरामात बसता येईल असं लहानसं तळं



त्याने शोधून काढलं. घुबड पाण्यात बसलं. जरा वेळाने घुबडाच्या अंगात रुतलेला मातीचा खडा पाण्यात भिजून मऊ झाला आणि विरघळून गेला. घुबडाला बरं वाटू लागलं.

पण लुच्च्या घुबडाला डॉक्टर कोकीळांची फी द्यायची इच्छा नव्हती.

दुसऱ्या दिवशी डॉक्टर कोकीळ पुन्हा रोग्याला पाहायला आले आणि घुबडाला बरा झालेला पाहून म्हणाले, ''अरे वा, रोगी ठीक दिसतोय आज. माझ्या औषधाचा गुण आला म्हणायचा.''

डॉक्टर कोकीळांना सुचवायचं होतं, 'गुण आला. आता माझी फी द्या.'

पण लबाड घुबड लगेच म्हणालं, ''पाण्यात नुसतं बसायचं हे कसलं आलं आहे औषध! औषधासाठी तुम्हाला काही खर्च थोडाच पडलाय? मी मुळीच फी देणार नाही.''

हे ऐकून डॉक्टर कोकीळ कावळ्याकडे गेले व म्हणाले, ''घुबडाची प्रकृती आता ठीक आहे, पण ते माझी फी द्यायला तयार नाही.''

कावळा म्हणाला, ''अहो डॉक्टर, घुबड फी देणार नाही असं कसं होईल? तुमची गंमत करत असेल ते. चला, आपण दोघं मिळून त्याच्याकडे जाऊ.''

दोघेही निघाले; पण घुबड कुठे लपून बसलं होतं ते सापडेच ना.

डॉक्टर कोकीळ म्हणाले,

''कावळ्या, तू घुबडाची हमी दिली होतीस. आता ते माझी फी देत नाही, तर तू माझी फी दिली पाहिजेस.''

पण कावळा निर्लज्जपणे हसून म्हणाला, ''मी कुठून देऊ? माझ्याकडे तर दिडकीसुद्धा नाही.''

डॉक्टर कोकीळ रागावले. त्याने कावळ्याविरुद्ध कोर्टात तक्रार केली.

जज्जसाहेबांनी सर्व हकिकत ऐकून घेतली आणि निकाल दिला,

''कावळ्याने फीची हमी घेतली होती. तेव्हा डॉक्टर कोकीळांची फी घुबड देत नसेल तर कावळ्याने ती द्यायला पाहिजे.''


कावळा लगेच म्हणाला,

''पण जज्जसाहेब, माझ्याकडे पैसेच नाहीत. मग मी कुठून फी देणार?''

जज्जसाहेब म्हणाले, ''हरकत नाही. पैसे नसले तर दुसरं काहीतरी दे. नाहीतर डॉक्टरांचं काही काम करून दे. असं कर, आजपासून डॉक्टर कोकिळांची अंडी तू उबवत जा.''

तेव्हापासून ते आजपर्यंत डॉक्टर कोकीळ कावळ्याच्या घरट्यात आपली अंडी ठेवतात आणि कावळा ती उबवून देतो.

घुबड त्या दोघांना चुकवण्यासाठी दिवसभर लपून रात्री शिकार करायला बाहेर पडू लागलं. ते अजूनही तसंच करतं.



हुशार बायको

(इंग्लिश लोककथा)

एका गावात एक भीमराव नावाचा माणूस राहत होता. त्याला शामराव नावाचा मुलगा होता.

एक दिवस भीमरावाने शामरावला एक मेंढ्याचं कातडं दिलं आणि सांगितलं, ''शामराव, हे कातडे बाजारात जाऊन विकून ये, मात्र कातड्याची किंमत आणली पाहिजे, आणि कातडंही परत आणलं पाहिजे.''

शामराव पाठोपाठ तीन दिवस बाजारात गेला; पण पैसे देऊन कातडंही परत देणारं कुणी त्याला भेटेना. बिचारा अगदी कंटाळून गेला.

शेवटी निराश होऊन परत घरी जायला निघाला. वाटेत नदी लागली. तिथे एक मुलगी कपडे धूत होती. शामरावचा उतरलेला चेहरा पाहून ती म्हणाली, ''काय झालं हो पाहुणे? चेहरा का असा?''

शामराव म्हणाला, ''काय करणार? मला हे कातडं विकून पैसे आणायचेत, शिवाय कातडंही परत पाहिजे. काय करावं, काही कळत नाही.''

मुलगी म्हणाली, ''आणा इकडे. मी घेते तुमचं कातडं.''

तिने कातडं घेऊन स्वच्छ धुतलं. त्याची लोकर काढून घेतली आणि कातडं परत देत म्हणाली, ''हे घ्या तुमचं कातडं परत आणि हे पैसे.''

पैसे आणि कातडं घेऊन शामराव घरी गेला तेव्हा भीमराव खूष झाला. म्हणाला, ''तुला अशीच हुशार बायको हवी. चल, तिला मागणी घालू या.''

दोघेजण मग त्या मुलीच्या, सगुणेच्या बापाकडे गेले. तिला मागणी घातली. लवकरच शामरावचं सगुणेशी लग्न झालं.

थोडे दिवस गेले. मग भीमराव शामरावला म्हणाला, ''चल, आता काही तरी काम शोधायला हवं. उद्या निघू या.''

भीमराव बांधकाम उत्तम करत असे आणि शामराव त्याला मदत करत असे. दोघेजण निघाले. वाटेत भीमराव म्हणाला, ''शामराव, वाट भारी लांब वाटते बाबा. ती आखूड कर काही तरी करून.''

शामरावला काय करावं ते कळेना. तेव्हा रागावून भीमरावानं त्याला घरी पाठवून दिलं.

घरी जाऊन तो बायकोला म्हणाला, ''बाबा म्हातारपणी चक्रम झालेत जरा. वाट आखूड करता आली नाही म्हणून मला घरी पाठवून दिलंय.''

सगुणा म्हणाली, ''अहो, असं काय करता? एखादी गोष्ट सांगावी, म्हणजे वाट


लवकर संपते. म्हणजेच आखूड होते ना? जा. गाठा मामंजींना.''

शामरावने धावतच जाऊन भीमरावाला गाठलं आणि गोष्ट सांगायला सुरुवात केली.

हां हां म्हणता वाट सरली आणि ते राजाच्या राजधानीत जाऊन पोचले. तिथे त्यांना राजाचा राजवाडा बांधायचं काम मिळालं. भीमराव आणि शामराव राजवाडा बांधू लागले.

शामरावाला सगुणाने सांगून ठेवलं होतं की, कुठंही गेलं तरी नोकरमाणसांशी प्रेमाने वागावं. त्याप्रमाणे तो करत असे. त्यामुळे लवकरच राजाचे सारे नोकर त्याचे मित्र झाले.

राजवाडा पुरा होत आला तेव्हा राजा स्वतः बघायला आला. म्हणाला, ''उद्या राजवाडा पुरा होईल ना? मग उद्या मी पुन्हा बघायला येईन आणि तुमचे पैसेही देईन.''



भीमरावला आणि शामरावला आनंद झाला. पण त्याच रात्री राजाचा एक नोकर शामरावला गुपचूप भेटायला आला आणि म्हणाला, ''तुम्ही वाडा फार सुंदर बांधला आहे. पण राजाचा असा विचार आहे की, असा वाडा तुम्ही दुसऱ्या कोणाला बांधून देऊ नये म्हणून तुम्हांला मारून टाकायचं.''

दोघे घाबरले पण रात्रभर विचार करून त्यांनी एक युक्ती शोधून काढली.


दुसऱ्या दिवशी राजा आला तेव्हा भीमराव म्हणाला, ''महाराज, वाडा पुरा झालाच आहे. पण थोडंच काम राहिलं आहे. त्यासाठी लागणारं हत्यार घरीच राहिलं आहे. माझा मुलगा घरी जाऊन घेऊन येईल''

पण राजा म्हणाला,

''छे; तुम्ही दोघांनी इथून जायचं नाही. माझा मुलगा जाईल. तुम्हांला काय हत्यार पाहिजे ते सांगा.''

राजपुत्र भीमरावाच्या घरी जायला निघाला. त्याच्याबरोबर भीमरावाने सगुणेला निरोप दिला,

''ह्याला वाकडा आणि सरळ दे.''



राजपुत्र सगुणेकडे गेला. निरोप ऐकल्यावर सगुणेच्या लक्षात आलं की, भीमराव आणि शामरावावर काही संकट आलं असणार.

पण तसं न दाखवता ती म्हणाली,

''राजकुमार, ते हत्यार ह्या पेटाऱ्यात आहे. जरा झाकण उघडायला मदत करता का?''

राजपुत्राने झाकण उघडलं. ''ते पाहा आत,'' सगुणा म्हणाली.

आणि राजपुत्र आत डोकावला तशी तिने त्याला आत ढकलून दिलं आणि झाकण लावून टाकलं. राजपुत्र पेटाऱ्यात एकाच वेळी सरळ आणि वाकडा होऊन अडकून बसला.

मग सगुणा राजपुत्राला म्हणाली, ''राजकुमार, महाराजांना माझ्या वतीने एक पत्र लिहून द्या. त्यात लिहा की शामराव आणि भीमरावांना सोडलंत तरच राजकुमारांना सोडीन.''

राजपुत्राने दिलेल्या पत्रामुळे भीमराव आणि शामराव सुखरूप घरी आले.

भीमराव आनंदाने म्हणाला, ''सूनबाई काय हुशार आहे! आता तिलाच राजापेक्षा सुंदर वाडा बांधून देतो.''



आणि फ्रॉ छमन रडला

(थायलंडमधील लोककथा)

फ्रॉ छमनचे सराफी दुकान म्हणजे बँकॉकच्या बाजारपेठेतलं सर्वांत प्रसिद्ध आणि ऐटबाज दुकान. उत्तमोत्तम हिरे-मोती हवी असणारी श्रीमंत गिऱ्हाइकं फ्रॉ छमनच्या दुकानात जाणारच अशी त्याची ख्याती. दुकानात उत्तमातला उत्तम माल असायचा हे तर खरंच, पण त्याहीपेक्षा फ्रॉ छमनमुळेच दुकानाला खरं महत्त्व होतं.

फ्रॉ छमन मोठा हुशार जवाहिऱ्या होता. हिऱ्यांची पारख करण्यात त्याचा हात कोणी धरू शकला नसता, पण त्याहीपेक्षा सज्जन व्यापारी म्हणून फ्रॉ छमनची ख्याती होती. कुणीही त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून अगदी डोळे मिटून खरेदी करावी. फसवणूक कधी व्हायचीच नाही.

त्या दिवशीही फ्रॉ छमन आपल्या दुकानात बसला होता. दुकानातले सारे काऊंटर नजरेपुढे राहतील, अशा तऱ्हेने एका बाजूला फ्रॉ छमनची मखमलीने सजवलेली ऐटबाज बैठक होती. समोर काच बसवलेलं प्रशस्त टेबल होतं. कोणी खास गिऱ्हाईक आलं की, फ्रॉ छमन आपल्या खास भागात त्याला निवडक माल दाखवीत असे.

त्या दिवशी फ्रॉ छमन असाच दुकानातल्या व्यवहारावर लक्ष ठेवीत आरामशीर बसला होता. एवढ्यात एक नोकर त्याच्याजवळ येऊन नम्रपणे म्हणाला,

"मालक, कोणी माणूस आपली भेट घेण्याचा हट्ट धरून बसला आहे.".

"कोण आहे? आपल्या नेहमीच्या गिऱ्हाइकांपैकी?"

"नाही मालक. फाटकासाच माणूस दिसतोय. पण ऐकतच नाही."

"बरं तर, दे पाठवून. आता मोकळाच आहे मी," क्षणभर विचार करून फ्रॉ छमन म्हणाला.

नोकर गेला आणि एका माणसाला घेऊन परत आला.

अंगाने फाटकासाच होता तो माणूस. अंगावरचे कपडे भारी, पण मळलेले, विरलेले होते. मूळच्या श्रीमंत माणसाला आता वाईट स्थिती यावी तसा त्याचा अवतार दिसत होता.

"नमस्कार. माझ्यासाठी थोडा वेळ काढू शकाल का?" मोठ्या नम्रपणे तो म्हणाला.

"या ना, बसा. काय काम आहे आपलं?" फ्रॉ छमन म्हणाला.

तो माणूस बसला. नोकर निघून गेला. त्या माणसाने इकडे तिकडे पाहिले आणि खिशातून एक मखमली बटवा बाहेर काढला. त्यातून एक लाल कागदाची पुरचुंडी काढली

आणि ती पुरचुंडी उलगडून त्यातून अगदी हलक्या हाताने एक चमकदार खडा काढून फ्रॉ छमनपुढे धरीत म्हणाला,

''महाशय, माझं नाव क्रो डी. आमच्या घराण्यात पूर्वापार चालत आलेला एक हिरा आहे. आज माझी परिस्थिती वाईट झाली, म्हणून घराण्याची निशाणी म्हणून जपलेला हा हिरा विकण्याची पाळी माझ्यावर आली. मला हा हिरा विकण्यासाठी आपल्याकडे सोपवायचा आहे. आपण कराल का एवढं माझ्यासाठी?''

बालमित्रांनो, खरं तर तो माणूस एक नंबरचा लुच्चा होता. त्याला एक काचेचा लोलक रस्त्यात सापडला होता. तो घासून, त्याला पैलू पाडून त्याने तो मखमली बटव्यातून हिरा म्हणून आणला होता. घराणं-बिराणं सगळ्या थापा.

त्यातून एखाद्या साध्या माणसाला तो काचेचा तुकडा हिरा वाटलाही असता, पण फ्रॉ छमन काही असा तसा माणूस नव्हता. बँकॉकमधला सुप्रसिद्ध रत्नपारखी होता तो.



तो काही असा फसणार होता थोडाच! तो तुकडा हातात घेताच त्याला कळलं की, तो हिरा नसून काचेचा तुकडा आहे.

''माफ करा क्रो डी साहेब, पण आपण आणला आहेत तो हिरा नसून काचेचा तुकडा आहे.''

''काय?'' क्रो डी एकदम संतापल्याचं नाटक करत म्हणाला, ''आमच्या घराण्यात पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या ह्या हिऱ्याला आपण काचेचा तुकडा म्हणता?''

क्रो डी मोठा अभिनयकुशल तर खराच, कारण पुढल्याच क्षणी त्याने दुःखाने कपाळावर हात मारून घेतला आणि डोळ्यांत पाणी आणून तो म्हणाला,

''बरोबर आहे म्हणा! दैवच जिथं फिरलं तिथं हिऱ्याला काचेच्या तुकड्याचीच दशा येणार! पण मला वाटलं होतं की, तुमच्यासारख्या रत्नपारख्याला तरी ह्याची किंमत कळेल.''

फ्रॉ छमन गप्प राहिला. ह्या भडिमारापुढे काय बोलणार तो!

एक लांबलचक सुस्कारा टाकून क्रो डी पुढे म्हणाला, ''ठीक आहे. नशीब माझं!''

आणि त्याने तो तुकडा उचलून पुन्हा लाल कागदात गुंडाळला. पुरचुंडी बटव्यात ठेवली आणि आता उठणार तेवढ्यात काहीतरी सुचल्यासारखं करत म्हणाला, ''महाशय, माझ्यावर एक कृपा कराल?''

त्याचं ते दुःखाचं नाटक पाहून बिचाऱ्या फ्रॉ छमनला दया येऊ लागली.

क्रो डी पुढे म्हणाला, ''हा हिरा तुम्हांला नको असला तर तुम्ही विकत घेऊ नका; पण नुसता तुमच्याजवळ ठेवून घ्याल का? तुमच्याकडे येणाऱ्या गिऱ्हाइकांना तो दाखवा आणि विकला गेला तर विका.''

फ्रॉ छमन जरा घुटमळत होता, पण शेवटी क्रो डीची दया येऊन म्हणाला, ''बरं बुवा, तुम्ही म्हणता तर ठेवून घेतो. पण विकला जाण्याची जबाबदारी माझ्यावर नाही बरं!''

''छे, छे,'' क्रो डी हात जोडून म्हणाला.

''बरं, तुम्हांला ह्याची किंमत किती यायला हवी?''

''तसा हा हिरा माझ्या दृष्टीने अमोलच आहे हो. पण आठ हजार चांदीची नाणी मिळाली तरी पुरे.''

आणि हिरा फ्रॉ छमनच्या स्वाधीन करून क्रो डी निघून गेला.

तीन महिने गेले. अजून तो 'हिरा' फ्रॉ छमनच्याच पेटीत पडून होता.

आणि मग एक दिवस एक फार मोठं गिऱ्हाईक फ्रॉ छमनच्या दुकानात आलं.

चीनच्या राजाच्या दरबारातून एक माणूस उत्तम हिऱ्यांच्या शोधात बँकॉक शहरात आला आणि अर्थात फ्रॉ छमनच्या दुकानाचा शोध करत आला. चीनच्या राजकन्येचं लग्न ठरलं होतं. त्यासाठी बनवायच्या हाराच्या मध्यभागी घालण्यासाठी त्याला मोठा आणि तेजस्वी हिरा हवा होता. फ्रॉ छमनने त्याला

आपल्या खास टेबलापाशी नेलं आणि आपल्या ठेवणीतल्या हिऱ्यांच्या पेट्या त्याच्यासमोर उघडायला सुरवात केली. वेगवेगळ्या आकारांचे, बघून डोळे दिपून जावेत असे एकाहून एक सुंदर हिरे त्याने काढले.

पण छे! त्याच्या पसंतीला एकही उतरेना.

फ्रॉ छमनच्या दुकानातले सारे हिरे संपले. पण पसंती होईना. फ्रॉ छमन अगदी चिडून गेला. त्याच्या दुकानात गिऱ्हाईकाला मनपसंत हिरा सापडू नये असं, आजवर कधी घडलंच नव्हतं.

एवढ्यात त्याला क्रो डीने ठेवलेल्या काचेच्या तुकड्याची आठवण झाली. ह्या खट्याळ गिऱ्हाइकाची गंमत करण्यासाठी त्याने तो हिरा एका चांदीच्या ताटलीत आणून गिऱ्हाइकापुढे ठेवला आणि तो गंभीरपणे म्हणाला, ''आता ही एकच खास चीज



माझ्याकडे उरली आहे, पण हा हिरा दुसऱ्याचा आहे. ह्याची जबाबदारी माझ्यावर नाही. तुम्हांला पाहिजे तर घ्या.''

त्या माणसाने त्या काचेच्या तुकड्यावर जशी काही झडपच घातली. सर्व बाजूंनी तो तुकडा न्याहाळून बघत तो उत्सुकतेने म्हणाला, ''असाच, अगदी असाच हिरा हवा होता मला. हा मी घेतलाच म्हणून समजा. काय किंमत आहे ह्याची?''

फ्रॉ छमनला त्या माणसाच्या अडाणी-पणाचा अतिशय राग आला. एवढे उत्तमोत्तम हिरे सोडून हा काचेचा तुकडा पसंत केला होता त्यानें. माकडाच्या हाती रत्न दिलं तर उपयोग काय म्हणा!

जरा रागानेच फ्रॉ छमन म्हणाला, ''हा हिरा ना! सोळा हजार चांदीची नाणी पडतील त्याला!''

''कबूल,'' तो माणूस म्हणाला, ''मी तुम्हांला चार हजार नाणी आता आगाऊ देतो. थोड्याच दिवसांत उरलेली रक्कम आणून देईन. तोवर हिरा तुमच्याकडे असू दे. कुणाला विकू मात्र नका. तसं लिहून द्या मला.''

फ्रॉ छमन कबूल झाला. लेखी करार तयार झाला. त्या माणसाने आठ दिवसांच्या आत उरलेली रक्कम देऊन हिरा न्यावा. मात्र मधल्या काळात फ्रॉ छमनने हिरा विकल्यास त्या माणसाची चार हजार नाणी परत देऊन नुकसानभरपाई म्हणून आणखी चार हजार चांदीची नाणी द्यावीत असं ठरलं.

चार हजार नाणी देऊन आणि कराराची एक प्रत घेऊन तो माणूस निघून गेला.

दोन दिवस गेले आणि क्रो डी एक दिवस फ्रॉ छमनच्या दुकानात आला.

नम्रपणे नमस्कार करून त्याने विचारलं, ''महाशय, आपण माझा हिरा विकलात का? विकला नसला तर मेहरबानी करून तो मला परत द्या. चीनच्या दरबारातून हिरे खरेदी करायला कोणी माणूस आला आहे म्हणून ऐकतो. त्याला तो दाखवावा म्हणतो.''

आता मात्र फ्रॉ छमन पंचायतीत पडला. क्रो डीचा हिरा परत द्यावा तर तो हिरा विकत घेणाऱ्या माणसाला त्याची ठेवून घेतलेली चार हजार नाणी आणि नुकसानभरपाई म्हणून चार अशी आठ हजार नाणी द्यावी लागणार. बरं, विकला तर अब्रू जाणार. कारण त्याने तर क्रो डीला सांगितलं होतं की, हा हिरा नसून काचेचा तुकडा आहे.

आता फ्रॉ छमनच्या पुढे एकच मार्ग उरला होता. तो म्हणजे आठ हजार चांदीची नाणी देऊन क्रो डीकडून हिरा स्वतःच विकत घेणं. फ्रॉ छमन म्हणाला,

''हे पहा साहेब. तुम्ही एवढ्या आशेनं हिरा दिला आहात, तर आता मीच तो तुमच्याकडून आठ हजार चांदीच्या नाण्यांत विकत घेतो. चालेल ना?''

क्रो डी म्हणाला, ''चालेल की, मला काय! कोणी का हिरा घेईना!''

फ्रॉ छमनने चटकन आठ हजार चांदीची नाणी त्याला देऊन टाकली.

''महाशय, तुम्ही मोठे प्रसिद्ध रत्नपारखी. तुम्ही आठ हजार चांदीची नाणी देऊन एक काचेचा तुकडा विकत घेतला आहे हे कोणाला सांगू नका बरं का!''

आणि तो हसत हसत निघून गेला. फ्रॉ छमन आशेने त्या हिरा विकत घेणाऱ्या माणसाची वाट बघत बसला. पण सात दिवस उलटून गेले तरी कोणी आलं नाही.

आता विचार करा. फ्रॉ छमनने त्या माणसाकडून चार हजार नाणी घेतली आणि क्रो डीला आठ हजार चांदीची नाणी दिली. म्हणजे चार हजार चांदीची नाणी देऊन एक काचेचा तुकडा विकत घेतला त्याने.

कुठल्याही जवाहिऱ्याला रडू कोसळेल अशीच ही घटना! आणि फ्रॉ छमन त्या दिवशी खरोखरच रडला.



राजाला पांढरा हत्ती हवा

(ब्रम्ही लोककथा)

ब्रह्मदेशातल्या एका शहरात एक धोबी राहत असे. मोठा मेहनती होता तो. खूप श्रम करी आणि त्यामुळे पैसेही भरपूर मिळवी.

पण दुसऱ्याचं चांगलं झालेलं पाहवत नाही अशी काही माणसं असतातच, तसाच एक कुंभार त्या गावात राहत होता. तो त्या धोब्याचा खूप हेवा करी. मनात म्हणे,

'केवढा पैसेवाला होऊन बसलाय हा धोबी! एकेकाचं नशीब बघा कसं सिकंदर असतं!'

पण पैसे मिळवण्यासाठी धोबी श्रम किती करतो हे त्याच्या लक्षातच येत नसे. चांगलं काम करून स्वतःचा धंदा वाढवण्याऐवजी धोब्याचं वाईट कसं होईल ह्याचीच काळजी तो करत असे. आणि तशी एक संधी त्याला लवकरच मिळाली.

ब्रह्मदेशात राजाकडे एक हत्ती होता. कुठल्याही हत्तीसारखा काळसर करड्या रंगाचा होता तो. पण राजाला मात्र अशी हौस होती की, आपल्याजवळ पांढऱ्या रंगाचा हत्ती असावा. कारण ब्रह्मदेशात पांढऱ्या रंगाचा हत्ती पवित्र मानला जातो.

हे कळताच कुंभार लगेच राजाकडे गेला. मुजरा करून म्हणाला, ''महाराज, आपल्याला पांढरा हत्ती पाहिजे आहे असं समजलं.''

राजा म्हणाला, ''हो बुवा, पांढऱ्या हत्तीशिवाय आमच्या वैभवाला शोभा नाही.''

कुंभार म्हणाला, ''महाराज, मला एक युक्ती सुचली आहे. माझ्या शेजारीच एक धोबी राहतो, तो फार हुशार आहे. आपला करडा हत्ती त्याच्याकडून धुवून चांगला पांढरा शुभ्र करून घ्यावा. म्हणजे उगाच हत्तीवर खर्च करायला नको.''

राजाला ही कल्पना फार आवडली. तो म्हणाला, ''असं? मग त्या धोब्याला ताबडतोब बोलावून आणा बरं.''

झालं! ताबडतोब त्या धोब्याला दरबारात हजर करण्यात आलं. तो मुजरा करून उभा राहताच राजा म्हणाला, ''धोब्या, तुला एक फार महत्त्वाचं काम सांगायचं आहे. आमचा करडा हत्ती धुऊन अगदी पांढरा स्वच्छ करून द्यायचा. जमेल का तुला हे काम?''

धोब्याला कुंभाराचा डाव समजला. तो लगेच म्हणाला, ''होय महाराज, अगदी लख्ख गोरा करून देतो हत्ती. पण त्यासाठी हत्ती मावेल एवढं मोठं भांडं हवं. ते ह्या कुंभाराला करून द्यायला सांगा.''

राजानं ताबडतोब कुंभाराला, धोब्याला हवं तसं भांडं करून द्यायला सांगितलं.

कुंभार काय बोलणार? मुकाट्याने घरी

गेला आणि त्यानं मोठ्या खटपटीनं एक भलं थोरलं मातीचं भांडं घडवलं.

भांडं दरबारात आणलं. धोब्याने त्यात पाणी भरलं आणि हत्तीला आणण्यात आलं. पण हत्तीने भांड्यात पाऊल टाकलं मात्र, भांडं गेलं फुटून.

धोबी म्हणाला, ''अरे, अरे! हे भांडं अगदीच कच्चं दिसतंय. ह्याहून भक्कम भांडं हवं.''

लगेच राजाचा कुंभाराला हुकूम सुटला, ''चांगलं आणि बळकट भांडं आण.''

ह्या वेळेला कुंभाराने चांगलं मोठं आणि जाडजूड भांडं बनवलं.

भांडं भल्या जंगी चुलीवर चढवण्यात आलं. त्यात पाणी भरून हत्तीला त्यात चढवलं. चुलीत लाकडं पेटवून मोठा जाळ केला. ह्या वेळेला हत्तीच्या वजनाने भांडं फुटलं नाही, पण भांडं इतकं जड होतं की, त्यातलं पाणी तापेच ना.

धोबी म्हणाला, ''महाराज, हे भांडं कामाचं नाही. भांडं हत्ती पेलेल इतकं बळकट आणि पाणी तापेल इतकं पातळ हवं.''

बिचारा कुंभार बळकट आणि पातळ भांडं बनवण्याचा राजाचा हुकूम घेऊन घरी गेला आणि आपलं बाकीचं काम सोडून रात्रंदिवस भांडी घडवू लागला. मोठी भांडी, जाड भांडी, पसरट भांडी, पातळ भांडी. पण एकही भांडं धोब्याच्या पसंतीला उतरेना.

कुंभाराचा धंदा बसला. त्याला धोब्याचा हेवा केल्याचं चांगलं फळ मिळालं, दुसरं काय!



लांडग्याचं जेवण

(पोलिश लोककथा)

एक होता लांडगा. तो एकटाच राहत असे. एकटा असल्याने त्याला मोठ्या प्राण्यांची शिकार करता येत नसे. मग त्याला मिळेल त्या शिकारीवर समाधान मानावं लागे. कधी कधी त्याला उपाशीही झोपावं लागे.

एका रात्री तो उपाशीच झोपला असताना त्याला एक स्वप्न पडलं. स्वप्नात त्याने एका गलेलठ्ठ प्राण्याची शिकार केली आणि त्याला खायला सुरुवात करणार तेवढ्यात त्याला जाग आली.

अजून अर्धवट झोपेतच असल्यामुळे त्याला स्वप्नात पाहिलंते खरंच वाटत होतं. तो लगेच गुहेबाहेर पडला आणि स्वप्नात केलेली शिकार शोधायला निघाला.

तेवढ्यात त्याला दोन पिल्लं बरोबर घेऊन चरायला आलेली एक बकरी भेटली.

"मिळाली शिकार," लांडगा जिभल्या चाटत म्हणाला, "आता आधी एक पिल्लू खातो. मग दुसरं पिल्लू खातो आणि शेवटी



बकरीला खातो. भयंकर भूक लागली आहे मला.''

बकरी मोठी धीट आणि हुशार होती. लांडग्याच्या बोलण्याला न घाबरता ती म्हणाली, ''लांडगेदादा, तू खुशाल आम्हाला खा. पण त्याआधी देवाची प्रार्थना तर करू दे आम्हाला.''

''बरं बरं, पटकन करा प्रार्थना,'' लांडगा गुरगुरत म्हणाला.

त्याबरोबर बकरी आणि तिची पिल्लं बेंबें करत मोठ्याने ओरडू लागली. तो आवाज ऐकून जवळच मेंढ्या चारत असलेला एक मेंढपाळ आपल्या कुत्र्याला घेऊन धावत आला. कुत्रा लांडग्याच्या अंगावर धावून गेला आणि लांडग्याला जीव घेऊन पळत सुटावं लागलं.


लांडगा लांब पळून गेला. धापा टाकत उभा राहिला. आणि मनाशी म्हणू लागला, ''काय गाढव आहे मी! चांगली शिकार हातची दवडली.''

तेवढ्यात त्याला उकिरड्यावर चरत असलेलं एक डुक्कर दिसलं. डुकराबरोबर नऊ पिल्लं होती

''आता मात्र चांगली शिकार मिळाली,'' लांडगा खुशीत येऊन म्हणाला, ''डुकरीणबाई, आधी तुला खातो आणि मग एक एक करत तुझी पिल्लं खातो.''

''खा बाबा,'' डुकरीण सुस्कारा सोडीत म्हणाली, ''आमचा मालक तरी आज ना उद्या आम्हाला खाणारच. मग आजच तू आम्हांला खाल्लंस तर काय बिघडणार आहे? पण लांडगेदादा, माझी बाळं आत्ताच पोटभर जेवल्यामुळे त्यांना तहान लागली आहे. तहानलेल्याला मारणं काही योग्य नाही. नदीकाठी नेऊन मी त्यांना पाणी पाजते, मग तू आम्हांला खा. तोपर्यंत तूसुद्धा तोंड धुऊन आमचा फराळ करण्यासाठी ताजातवाना हो.''

लांडगा भोळेपणाने तयार झाला. सारे नदीकाठी आले. डुकरिणीची पिल्लं पाणी पिऊ लागली. लांडगासुद्धा काठावर उभा राहून तोंड धुऊ लागला. त्याच वेळी लांडगा बेसावध आहे हे पाहून डुकरिणीने त्याला जोरदार धडक दिली. काय होत आहे ते कळायच्या आतच लांडगा नदीच्या प्रवाहात गटांगळ्या खाऊ लागला. डुकरीण पिल्लांना घेऊन पळून गेली.



लांडगा खूप चिडला. कसाबसा पाण्यातून बाहेर पडला आणि पुढे निघाला, तेवढ्यात त्याला एक कोंबडा दिसला.

‘‘आता मात्र ह्याला सोडायचं नाही,’’ लांडगा स्वतःशीच म्हणाला.

कोंबडा म्हणाला,

‘‘लांडगेदादा, तू मला आता खाणारच. पण त्याआधी मला एकदा आरवू दे ना.’’

पण लांडगा म्हणाला,

‘‘मी असा फसणार नाही. आरवण्याचं निमित्त करून तू पळून जाशील.’’

‘‘तू माझी शेपटी तोंडात घट्ट पकडून ठेव ना,’’ कोंबडा म्हणाला, ‘‘मग मी कसा पळेन?’’

लांडग्याला हे पटलं. त्याने कोंबड्याच्या शेपटीची पिसं तोंडात घट्ट धरली, पण कोंबडा जेव्हा पंख फडफडवत आरवू लागला तेव्हा लांडग्याच्या नाकाला गुदगुल्या झाल्या आणि त्याला शिंक आली. कोंबड्याची शेपटी त्याच्या तोंडातून सुटली. कोंबडा उडून गेला.

‘‘काय मूर्ख आहे मी!’’ लांडगा म्हणाला, ‘‘ही शिकार पण निसटली. आता दिवसभर उपासच पडणार असं दिसतं आहे.’’

लांडगा पुढे चालला. तेवढ्यात त्याला एक बदक दिसलं.

‘‘आता तुला मात्र मी सोडणार नाही,’’ लांडगा म्हणाला, ‘‘तुला खाणारच.’’

आणि त्यानं बदकाला पकडलं.

बदक म्हणालं,


‘‘खा ना. पण माझ्या अंगाला चिखल लागला आहे. जरा आंघोळ करून येऊ दे ना.’’

‘‘छे, छे, अंघोळ-बिंघोळ काही नको. पळून जाशील तू.’’ लांडगा म्हणाला.

‘‘माझी शेपटी धरून ठेव ना तू,’’ बदक म्हणालं.

लांडगा फसला. त्याने बदकाची शेपटी धरली आणि त्याला पाण्यात जाऊ दिलं. पाण्यात उतरताच बदकाने असा हिसका दिला की, लांडग्याच्या तोंडात एक-दोन पिसं राहिली. बदक पोहत निघून गेलं.

लांडगा निराश होऊन म्हणाला,



‘‘भुकेने मरायचंच माझ्या नशिबात दिसतं आहे बहुतेक.’’

तेवढ्यात त्याला एक घोडी आपल्या पिल्लाबरोबर येताना दिसली. लांडगा तिला म्हणाला,

‘‘बरी सापडलीस. आता तुला खातो.’’


‘‘वा रे वा,’’ घोडी म्हणाली, ‘‘मला खाऊच शकणार नाहीस तू! ‘मला कुणी खायचं नाही’ असं पत्रच आहे माझ्याजवळ.’’

‘‘असल्या पत्रांना मी घाबरणार आहे की काय? बघू कुठे आहे पत्र?’’ लांडगा म्हणाला.

‘‘हे बघ माझ्या तळपायावर लिहिलं आहे,’’ असं म्हणून घोडीने एक पाय वर उचलला. त्या पायाला लोखंडाचा नाल मारलेला होता. लांडगा पत्र वाचण्यासाठी खाली वाकताच घोडीने त्याच्या तोंडावर अशी लाथ मारली की, तो बेशुद्ध पडला. घोडी निघून गेली.

शुद्धीवर आल्यावर लांडगा म्हणाला,

‘‘मी ख़रंच मूर्ख आहे. उपाशी मरणंच माझ्या नशिबात दिसतं आहे.’’



तेवढ्यात त्याला एक मेंढा दिसला. मेंढा म्हातारा झाला होता, पळू शकत नव्हता. त्यामुळे लांडग्याने त्याला सहज पकडलं.

लांडगा मेंढ्याला म्हणाला,

''मी आता तुला खाणार. मला इतकी भूक लागली आहे की, मी दगडसुद्धा चावून खाऊ शकेन.''

तेव्हा मेंढा म्हणाला,


''लांडगेदादा, मीसुद्धा आता आयुष्याला कंटाळलो आहे. तेव्हा तू मला खुशाल खा. आपण असं करू या, तू तोंड उघडून बस. मी तुझ्या तोंडात उडी मारतो, मग तू मला खा.''

''वा! झकास कल्पना आहे,'' लांडगा म्हणाला.

मेंढा म्हणाला, ''तू ह्या झऱ्याकडे पाठ करून उभा रहा. खूप मोठा 'आ' कर. मी ह्या समोरच्या खडकावर चढतो आणि तिथून तुझ्या तोंडात उडी घेतो.''

लांडगा तोंड उघडून उभा राहिला आणि मेंढ्याने खडकावरून त्याच्या अंगावर इतकी जोरात उडी घेतली की, लांडगा झऱ्यात धप्पकन पडला. मेंढा पळून गेला.

लांडगा निराश होऊन दाट जंगलात परत गेला. एका झाडाला टेकून बसला. आपल्या



मनाशी म्हणाला, ''शेवटी आज उपासच घडला. पण दोष माझाच आहे. मीच मूर्ख आहे.''

आता गंमत अशी झाली की, त्या झाडामागे एक शिकारी शिकार करण्यासाठी लपून बसला होता. त्याला लांडग्याची भाषा समजत होती.

लांडगा पुढे म्हणाला,

''आतातरी मी धडा शिकायला हवा. पण त्यासाठी कोणीतरी मला शिक्षा केली पाहिजे. कोणी जर शिक्षा म्हणून माझी शेपटी तोडून टाकली, तरी मी काही बोलणार नाही.''

हे ऐकून शिकाऱ्याला गंमत वाटली. तो म्हणाला, ''हात्तेच्या! लांडगेबुवा, तुम्हांला शिक्षा पाहिजे ना! मी कापतो तुमची शेपटी.'' आणि त्याने लांडग्याची शेपूट कापून टाकली.

लांडगा ओरडत जागचा उठला आणि पळत सुटला. पळता पळता ओरडला, ''मिळालं रे बाबा जेवण! अगदी भरपूर जेवण मिळालं मला.''



जगाची रीत

(पोलिश लोककथा)

वादळी रात्र होती. ढगांचा गडगडाट होत होता. विजा चमकत होत्या. वाऱ्याच्या जोरामुळे झाडं कोसळून पडत होती. रात्रभर पाऊस सुरूच होता. तो संध्याकाळी जरासा थांबला.

शेतकऱ्याने आपल्या झोपडीच्या बाहेर डोकावून पाहिलं. पाऊस थांबलेला पाहिल्यावर त्याला वाटलं की, जंगलात जावं आणि जळणासाठी काटक्या गोळा करून आणाव्यात. वादळामुळे झाडंही पडली असणार. भरपूर सरपण मिळेल.

शेतकऱ्याने आपली कुऱ्हाड घेतली आणि तो जंगलात गेला. लाकडं गोळा करू लागला. तेवढ्यात त्याला कुणीतरी कण्हत असल्याचा आवाज आला.

शेतकरी आधी घाबरला. पण नंतर त्याला वाटलं की, कोणीतरी संकटात सापडलेलं दिसतं आहे म्हणून त्याने मोठ्याने विचारलं,

''कोण कण्हतंय? कोणाला मदत पाहिजे आहे का?''

तेव्हा जवळच्या एका दगडामागून आवाज आला,

''माझ्यावर दया कर. ह्या दगडामागून मला सोडव. मी तुला बक्षीस देईन.''

शेतकऱ्याने विचारलं,

''काय हिशेबाने बक्षीस देशील?''

पुन्हा आवाज आला,

''म्हणजे काय? त्यात हिशेब कसला? जगाच्या रीतीप्रमाणे बक्षीस देईन.''

शेतकऱ्याने आपल्या कुऱ्हाडीने तो दगड जरा सरकवला. त्याबरोबर सळसळ करीत एक भला मोठा अजगर बाहेर आला.

बाहेर येताच म्हणाला,

''शेतकऱ्या, आता मी तुला खातो.''

शेतकरी घाबरून म्हणाला,

''अरे, आत्ताच तर बक्षीस देण्याच्या गोष्टी करत होतास आणि आता खाणार म्हणतोस! म्हणजे कमाल आहे.''



त्यावर अजगर लगेच म्हणाला,

‘‘जगाची रीत तशीच आहे. मी म्हणालो होतो की, जगाच्या रीतीप्रमाणे तुला बक्षीस देईन. म्हणून आता मी तुला खाणार.’’

शेतकरी गयावया करत म्हणाला,

‘‘अरे, कुणी खून केला तरी त्याचा निवाडा न्यायाधीशापुढे होतो. तेव्हा आपण कुणाकडे तरी न्याय मागू या.’’

‘‘ठीक आहे,’’ अजगर म्हणाला. तेवढ्यात एक घोडा तिथे चरताना दिसला.

अजगर म्हणाला,

‘‘चल, त्या घोड्याला विचारू.’’

‘‘ठीक आहे, चल,’’ शेतकरी म्हणाला, ‘‘मी तुझा जीव वाचवला आणि तू मला खाणार हे बरोबर नाही, हे घोड्यालासुद्धा पटेल.’’

दोघे घोड्याजवळ गेले. घोडा अगदी म्हातारा आणि मरतुकडा होता. दोघे त्याला म्हणाले,

‘‘घोडेदादा, तूच न्याय कर.’’


‘‘कसला न्याय?’’ घोड्याने विचारलं.

शेतकरी म्हणाला,

‘‘ह्या अजगराला मी दगडाखालून सोडवलं. तर आता तो मलाच खायला निघाला आहे. तो म्हणतो की जगाची रीतच तशी आहे. आता तूच न्याय कर.’’

‘‘बरोबर आहे त्याचं म्हणणं,’’ घोडा म्हणाला,

‘‘मी जेव्हा तरुण होतो, मालकाची घोडागाडी इतर पाच घोड्यांबरोबर ओढत



होतो, तेव्हा माझं कौतुक होत होतं; खायला हरभरा होता. आणि आता मी म्हातारा झालो, तर मालकाने मला जंगलात एकटं सोडून दिलं आहे. वर म्हणाला, ''लांडग्याने खाल्ला तर पीडा गेली, उपकाराची फेड अपकाराने हीच जगाची रीत आहे.''



पण शेतकऱ्याला पटेना. तो म्हणाला,

''अजगरा, आपण आणखी कोणाला तरी विचारू.''

दोघे पुढे गेले तेव्हा त्यांना एक म्हातारा, मरतुकडा कुत्रा भेटला.

शेतकरी म्हणाला,

''कुत्र्या, माझी कहाणी ऐक आणि मला न्याय दे.''

त्याने सांगितलेली हकिकत कुत्र्याने ऐकून घेतली आणि तो म्हणाला,

''अजगर म्हणतो ते खरं आहे. जगाची रीत अशीच आहे. माझंच पहा ना. मी लहान होतो तेव्हा मालकाने लाडाने मला घरात ठेवलं होतं. मी खुर्चीवर बसत असे. मालक खाईल ते खात असे. पुढे मोठा झालो तेव्हा पहारा देण्याचं काम करू लागलो. तेव्हा मला बसायला घोंगडी होती, दोन वेळा खायला मिळत होतं. पण आता मी म्हातारा झालो. माझ्यानं काम होत नाही, तर आता मालकानं मला सोडून दिलं आहे. उकिरड्यावर काय मिळेल ते खाऊन मी जीव जगवतो आहे. तेव्हा शेतकऱ्या, अजगराने तुला खाल्लं तर त्यात काहीच चूक नाही.''

अजगर खूष होऊन म्हणाला,

''ऐकलंस ना? आता मी तुला खातो.''

पण शेतकरी म्हणाला,

''आणखी एका कोणाला तरी विचारू.''

पुढे गेल्यावर त्यांना एक कोल्हा भेटला. शेतकरी त्याला म्हणाला,

''कोल्ह्या, मला न्याय दे.''

कोल्हा म्हणाला,

''काय झालं ते नीट सांगा पाहू.''

दोघांनी सगळी हकिकत सांगितली. कोल्हा म्हणाला,

''ठीक आहे. मी न्याय करतो. पण पहिल्यांदा मला तुम्हा दोघांशी एकेकटं बोललं पाहिजे. त्याशिवाय काय झालं, ते मला नीट समजणार नाही.''

मग कोल्ह्याने शेतकऱ्याला एका बाजूला बोलावलं. म्हणाला,

''शेतकऱ्या, मी तुझा जीव वाचवीन. पण त्याबद्दल तू मला काय देशील?''

शेतकरी आनंदाने म्हणाला,

''तू मागशील ते देईन.''

कोल्हा म्हणाला,

''दर रविवारी एक कोंबडी देशील?''

शेतकऱ्याने हे कबूल केल्यावर कोल्ह्याने अजगराला एकीकडे घेतलं आणि म्हणाला,

''तुम्ही ही हकिकत सांगता आहात खरी. पण साक्षीदार कुठं आहेत? तेव्हा आपण जिथे ही घटना घडली, तिथे जाऊन प्रत्यक्ष काय घडलं, ते पाहिलं पाहिजं.''

अजगर ह्या गोष्टीला कबूल झाला. तेव्हा तिघेजण पुन्हा अजगर ज्या दगडाखाली अडकला होता तिथे गेले.


कोल्हा म्हणाला,

''हं, तर तू म्हणतोस की, हा अजगर त्या दगडाखाली अडकला होता.''

''हो, बरोबर.'' शेतकरी म्हणाला.

''मग तू काय केलंस?'' कोल्ह्याने विचारलं.

''मी माझ्या कुऱ्हाडीने दगड जरासा सरकवला, आणि अजगराला बाहेर काढलं,'' शेतकरी म्हणाला.



“मग उचल बघू दगड जरासा. हं! आणि अजगरा तू पुन्हा दगडाखाली जा. गेलास? आता शेतकऱ्या, दगड ठेव त्याच्या अंगावर. ठेवलास? असाच अडकला होता ना अजगर?” कोल्हा म्हणाला.

“हो,” शेतकरी म्हणाला.

“अरे, मला सोडवा ना,” अजगर ओरडू लागला.

“सोडवेल ना कुणीतरी तुला. चल शेतकऱ्या, तुझ्या झोपडीकडे चल.”

जीव वाचल्याच्या आनंदात शेतकरी कोल्ह्याला आपल्या झोपडीत घेऊन गेला.

त्याने त्याला एक कोंबडी दिली.

कोल्ह्याने कोंबडी घेतली आणि जाता जाता म्हणाला, “पुढल्या आठवड्यात येतो बरं का, कोंबडी न्यायला!”

त्यानंतर दर आठवड्याला कोल्हा येऊन शेतकऱ्याकडून एक कोंबडी नेऊ लागला. बरेच महिने गेले. शेतकरी हळूहळू कोल्ह्याने आपला जीव वाचवला होता हे विसरून गेला. दर आठवड्याला कोल्ह्याला कोंबडी द्यायचं त्याच्या जिवावर येऊ लागलं.

मग एक दिवस जेव्हा कोल्हा कोंबडीसाठी आला, तेव्हा शेतकऱ्याने बंदूक घेतली आणि कोल्ह्याला गोळी घातली.

कोल्हा तडफडू लागला आणि मरता मरता म्हणाला,

“अजगर म्हणत होता तेच खरं. जगाची रीतच अशी आहे.”



छान धडा शिकवला

(पर्शियन लोककथा)

पर्शिया नावाच्या देशात एक श्रीमंत व्यापारी राहत होता. त्याला एकच मुलगा होता, पण असा उनाड मुलगा साऱ्या देशात दुसरा नव्हता. सबंध दिवस तो आपल्या मवाली मित्रांसह उनाडक्या करत भटकत राही. कोणाच्या घरात सडकी अंडी फेकायची, कुणाच्या मांजरांच्या शेपट्या ओढायच्या, रस्त्याने जाणाऱ्या माणसांच्या पायात पाय अडकवून त्यांना पाडायचं असे त्यांचे धंदे चालत. बिचारा व्यापारी सारखा आपल्या मुलाला उपदेश करी, त्याने आपलं वागणं सुधारावं म्हणून प्रयत्न करी. पण मुलावर त्याचा काहीही परिणाम होत नसे. शेवटी हताश होऊन बाप म्हणे,

''आयुष्य म्हणजे काही पोरखेळ नाही. मी मरून गेलो, एकटा राहिलास, म्हणजे पटेल तुला.''

शेवटी मुलगा ऐकत नाही असं पाहिल्यावर व्यापाऱ्याने ठरवलं की, आपण मुलासाठी काहीतरी तरतूद करून ठेवली पाहिजे. खूप विचार केल्यावर त्याला एक युक्ती सुचली. त्याने आपल्या झोपण्याच्या



खोलीच्या छतास एक भोक पाडलं. त्यात त्याने एक हजार सोन्याच्या मोहरा ठेवल्या आणि भोक बुजवून टाकलं. वरून रंग लावून सगळ्या भेगा बुजवून टाकल्या आणि त्या जागी एक लोखंडी कडं बसवलं.

"बाबा, हे कडं कशासाठी आहे?" मुलाने विचारलं, "तिथे एखादा दिवा-बिवा लावायचा आहे का?"

"ते कडं दिव्यासाठी नाही," व्यापारी म्हणाला, "ते तुझ्यासाठी आहे. एक दिवस असा येईल की, तुझ्याजवळचे सारे पैसे संपतील. उपाशी मरायची वेळ येईल. कुणी मदत करणार नाही. तेव्हा एक जाड दोरी ह्या कड्याला बांध. तिचं दुसरं टोक स्वतःच्या गळ्याभोवती बांध आणि फास लावून घे."

व्यापाऱ्याचं बोलणं ऐकून मुलगा हसत सुटला. व्यापारी बिचारा गप्प बसला.

पुढे काही दिवसांनी व्यापारी मेला. सारी संपत्ती मुलाच्या हाती आली. बापाच्या मरणाचं दुःख करण्याऐवजी मुलगा हाती आलेला पैसा उधळू लागला. दोन-तीन वर्षांत जवळचे पैसे संपले. मग त्याने घरातलं सामान विकायला सुरुवात केली. चांदीची भांडी, भारी गालिचे असं एक एक विकता विकता सारं घर रिकामं झालं. एक एक करून सगळे नोकर गेले आणि व्यापाऱ्याचा मुलगा रिकाम्या घरात एकटा उरला.

पण तरी उनाड मित्रांची संगत मात्र त्याने सोडली नव्हती. एक दिवस मित्रांबरोबर भटकत असताना ते एका सुंदर बागेत आले.

"वा! काय सुंदर बाग आहे," एक मित्र म्हणाला, "ह्या झाडांच्या थंडगार सावलीत मस्तपैकी जेवण करायला काय मजा येईल!"

आणि मग तो व्यापाऱ्याच्या मुलाला म्हणाला, "मित्रा, आजच्या जेवणाचा खर्च तू करायचा."

"जरूर" व्यापाऱ्याचा मुलगा म्हणाला.

"उद्या ह्याच ठिकाणी, ह्याच वेळी जमायचं. खाण्यापिण्याची व्यवस्था माझ्याकडे लागली."

खरं म्हणजे व्यापाऱ्याच्या मुलाकडे एक पैसासुद्धा नव्हता. जेवण द्यायचं कबूल तर करून बसला. आता काय करायचं, असा प्रश्न त्याच्यापुढे पडला.

तेवढ्यात त्याला आपल्या आत्याची आठवण झाली. आत्याचं त्याच्यावर खूप प्रेम होतं. त्याला वाटलं, ती नक्कीच पैसे देईल.

व्यापाऱ्याचा मुलगा लगेच आत्याकडे गेला. म्हणाला,

"ए आत्या, मी उद्या मित्रांना जेवण द्यायचं कबूल करून बसलो. पण माझ्याकडे पैसे नाहीत. जेवण दिलं नाही तर मित्र हसतील. मला देशील का पैसे?"

आत्या आपल्या लाडक्या भाच्याला 'नाही' म्हणणं शक्यच नव्हतं. तिने घरातल्या काही वस्तू गहाण ठेवल्या आणि भाच्याला पैसे दिले. शिवाय जेवणासाठी लागणाऱ्या वस्तू विकत आणायला त्याला मदतही केली.

सारी तयारी झाली तेव्हा व्यापाऱ्याचा मुलगा खुशीत आला. खाण्याच्या साऱ्या वस्तू नीट बांधून घेऊन तो ठरलेल्या जागी निघाला. जिथं भेटायचं होतं ती बाग बरीच लांब होती. बिचारा चालून थकला. हातातलं ओझं जड भासू लागलं तेव्हा तो विश्रांती घेण्यासाठी एका झाडाखाली बसला. हातातलं बोचकं बाजूला ठेवलं आणि घाम पुसत विसावा घेऊ लागला.

तेवढ्यात एक कुत्रा आला आणि बोचक्याचा वास घेऊ लागला.

''हाड्, हाड्...'' व्यापाऱ्याचा मुलगा ओरडला. पण त्या कुत्र्याने बोचकं पळवलंच. व्यापाऱ्याचा मुलगा त्याच्यामागे धावला, पण कुत्रा काही त्याला सापडला नाही.

बिचारा व्यापाऱ्याचा मुलगा हात हालवत ठरलेल्या बागेत पोचला. तिथे त्याचे मित्र जमले होते. कुत्र्याने आपण आणलेल्या खाण्यापिण्याच्या वस्तू कशा पळवल्या हे तो बिचारा सांगू लागला, पण त्याचे मित्र त्याची चेष्टा करू लागले. त्याला हसू लागले.

मित्रांचं वागणं पाहिल्यावर आपण कसल्या वृत्तीच्या लोकांना आपले मित्र समजत होतो, हे त्याच्या लक्षात आलं. तो रिकाम्या हातांनी येताच मित्रांनी त्याच्याकडे पाठ फिरवली होती. आपण ज्यांना मित्र समजत होतो ते केवळ मजा करण्यासाठी आपल्याभोवती जमले होते हे लक्षात येताच त्याला वाईट वाटलं. आपले वडील जो उपदेश करत होते, तो न ऐकल्याचा त्याला पश्चात्ताप



आता झाला त्याने ठरवलं की, वडिलांनी सांगितल्याप्रमाणे आपण जीव द्यावा.

त्याने एक जाड दोरी घेतली आणि आपल्या वडलांच्या खोलीत जाऊन त्यांनी छताला लावलेल्या लोखंडी कडीला त्याने त्या दोरीचं एक टोक बांधलं. मग ती कडी मजबूत आहे की नाही ते पाहण्यासाठी त्याने दोरीला एक हिसका दिला. त्यासरशी ती कडी छतातून निघून आली आणि व्यापाऱ्याच्या मुलाच्या डोक्यावर सोन्याच्या मोहरांचा पाऊस पडला.

व्यापाऱ्याचा मुलगा चकित होऊन पाहतच राहिला. मग एकदम त्याच्या ध्यानात आलं की, त्याच्या वडलांचं त्याच्यावर फार प्रेम होतं. तो उनाडपणे वागला, त्याने वडलांचं ऐकलं नाही; पण वडलांनी त्याच्यावर राग धरला नाही. उलट त्याचे मित्र केव्हातरी त्याला एकटा टाकतील हे ओळखून त्यांनी

त्याला मदत करण्याची व्यवस्था करून ठेवली, हे त्याला समजलं. मोहरांबरोबर त्याला वडलांची एक चिठ्ठीही मिळाली. तिच्यात लिहिलं होतं,

माझ्या मुलावर जेव्हा जीव देण्याची वेळ येईल, तेव्हा ही संपत्ती उधळून टाकण्याची इच्छा त्याला होणार नाही कारण तोवर त्याला पैशाची किंमत समजलेली असेल.

चिठ्ठीत लिहिलं होतं ते खरंच होते. दुसऱ्याच दिवशी व्यापाऱ्याच्या मुलाने वडलांचं बंद केलेलं दुकान उघडलं. त्यात माल भरला. घरातलं गहाण टाकलेलं सामान परत आणलं. जुने नोकर परत बोलावले. अतिशय मेहनतीने त्याने पुन्हा धंदा सुरू केला आणि पहिल्यांदा आपल्या आत्याचे पैसे दिले. खूप मेहनत घेऊन त्याने आपली गेलेली श्रीमंती परत मिळवली.

एक दिवस त्याच्या जुन्या उनाड मित्रांपैकी एकाने त्याला दुकानात पाहिलं आणि तो श्रीमंत झालेला पाहून पुन्हा येणं-जाणं सुरू केले. इतर जुने मित्रही पुन्हा येऊ लागले.

व्यापाऱ्याच्या मुलाने त्या सगळ्यांना पूर्वी बोलावलं होतं, तसं त्याच बागेत पुन्हा एकदा मेजवानीला बोलावलं. सर्वजण जमले पण मेजवानीची काहीच तयारी नव्हती.

''मित्रांनो,'' व्यापाऱ्याचा मुलगा म्हणाला, ''जेवणाची काहीच तयारी नाही म्हणून तुम्हांला आश्चर्य वाटलं ना? पण सकाळी माझा स्वयंपाकी मटण कापत होता, तेवढ्यात एक उंदीर आला आणि त्याने सुरीच पळवली. त्यामुळे माझा स्वयंपाकी स्वयंपाकच करू शकला नाही. आहे की नाही मजा?''

''कमालच झाली मोठी,'' सगळे मित्र म्हणाले. मग त्यांतला एकजण सांगू लागला,

''आमच्या घरी मागच्या आठवड्यात उंदराने अशीच सुरी पळवली.''

दुसरा म्हणाला,

''अहो, हे तर काहीच नाही. आमच्या घरी तर उंदराने सुरी, तवा आणि सगळी पातेलीसुद्धा पळवली.''

त्यावर तिसरा म्हणाला,

''अहो, आमच्या घरी तर उंदराने भांडीकुंडी, लाकडं, एवढंच नव्हे तर आमच्या स्वयंपाक्यालासुद्धा पळवून आपल्या बिळात नेलं.''

व्यापाऱ्याचा मुलगा हे सगळं शांतपणे ऐकत होता. मग तो म्हणला,

''काही दिवसांपूर्वी मी तुम्हांला असंच जेवायला बोलावलं होतं. त्यावेळी एका कुत्र्याने खरोखरच खाण्याचे सारे पदार्थ पळवले होते, पण तेव्हा तुम्ही मला हसलात. माझ्याकडे पाठ फिरवलीत आणि आज मी श्रीमंत आहे म्हणून मी वाटेल ते सांगितलं तरी तुम्ही ऐकून घेत आहात. संकट येतं तेव्हाच खऱ्या मित्रांची परीक्षा होते, हेच खरं.'' आणि व्यापाऱ्याचा मुलगा तिथून निघून गेला.

घडाभर अक्कल

(इंग्लिश लोककथा)

चंदनपूर गावात एक गरीब बाई आणि तिचा एकुलता एक मुलगा सदू राहत होते. सदू बिचारा अगदी भोळसर आणि मूर्ख होता. गावातली माणसं नेहमी त्याची थट्टा करत आणि त्याला गमतीने म्हणत, सदोबा, टेकडीवरच्या त्या शहाण्या आजीबाईकडून एक घडाभर अक्कल घेऊन ये बाबा.

खूप वेळा हे ऐकल्यावर सदू एकदा आपल्या आईला म्हणाला,


''आई, टेकडीवरची ती शहाणी आजीबाई खरंच अक्कल विकते का गं? मला देईल का गं ती थोडीशी?''

बिचारी आई म्हणाली,

''बाळा, देत असली तर खरंच आण थोडी अक्कल तिच्याकडून. मला तुझी फार काळजी वाटते बाबा. माझ्यानंतर तुझं कसं होणार? जा तिच्याकडे आणि थोडी अक्कल माग, पण नीट वाग हो. नाहीतर ती रागावेल.''

सदू त्याच दिवशी टेकडीवरल्या त्या शहाण्या आजीबाईकडे गेला.

आजीबाई चुलीवर काहीतरी ढवळत बसल्या होत्या.



''नमस्कार आजीबाई,'' सदू म्हणाला.

''नमस्कार,'' आजीबाई म्हणाल्या.

''हवा छान पडलीय़ नाही?''

''हं.''

''पण एखादवेळी पाऊसही पडेल.''

''पडेलसुद्धा.''

''एखादवेळी नाहीसुद्धा पडायचा म्हणा.''

''तेही शक्य आहे.''

सदू डोकं खाजवून आता काय बोलावं याचा विचार करू लागला. आता हवापाण्याबद्दल बोलण्यासारखं काही उरलंच नव्हतं. आता काय बरं बोलावं? जरा विचार करून सदू म्हणाला,

''पिकं चांगली आली आहेत नाही यंदा! आणि जनावरांना चारासुद्धा भरपूर आहे.''

''हं!''

सदू म्हणाला, ''मला वाटतं आता पीकपाण्याचंही बोलणं आटपलं. आता कामाचं बोलू का? तुम्ही अक्कल विकता का हो?''

आजीबाई म्हणाल्या, ''तुला कसली अक्कल पाहिजे, ह्यावर अवलंबून आहे. तुला एखाद्या पंडिताएवढी अक्कल पाहिजे असेल तर नाही मिळणार.''

''छेः बुवा,'' सदू म्हणाला, ''इतकी काय करायचीय? मला आपली चारचौघांएवढी अक्कल पुरे.''

आजीबाई म्हणाल्या, ''हां, मग मिळेल. पण त्यासाठी तुला सगळ्यात जे आवडत असेल, त्याचं काळीज मला आणून दे. त्यानंतर एका कोड्याचं उत्तर द्यायला लागेल. मग अकलेचं बघू.''

सदू लगेच घरी गेला. त्याने आपले आवडतं डुक्कर मारून त्याचं काळीज घेतलं आणि तो आजीबाईकडे गेला. आजीबाईंनी काळीज ठेवून घेतलं आणि त्याला कोडं विचारलं,

''सांग बघू. पाय नाहीत पण एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जातं असं कोण?''

सदूने खूप विचार केला पण त्याला उत्तर सुचेना. तेव्हा आजीबाई म्हणाल्या,

''नाही येत उत्तर? मग नाही तुला अक्कल मिळणार. जा पाहू.''

बिचारा सदू निराश होऊन घरी परत गेला. घरी पाहतो तो आई अतिशय आजारी झालेली. आईचे दुखणं वाढतच गेलं आणि शेवटी ती वारली.

बिचाऱ्या सदूला फार वाईट वाटलं. आई आपल्यावर किती प्रेम करायची ते आठवून त्याला रडू येऊ लागलं. त्याची आई नेहमी म्हणायची, ''सदू, माझ्यानंतर तुझं कसं होणार रे? तुला अगदी अक्कल नाही.'' आणि अजून अक्कल तर मिळालीच नव्हती त्याला.

एक दिवस सदू असा रडत बसला असताना त्याला एक मुलगी भेटली. त्याची दया येऊन म्हणाली,

''का रे बाबा रडतोस?''

सदू म्हणाला,

''रडू नको तर काय करू? माझी आई

मेली. मला आता कोणीच नाही. शिवाय मला अक्कल पण नाही. सगळे मला हसतात. आजीबाईंकडे गेलो तर त्यांनी अक्कल दिलीच नाही मला.''

''कोण आजीबाई?'' मुलीने विचारलं. सदूने मग तिला सगळी हकिकत सांगितली. सारं ऐकून मुलगी म्हणाली,

''एवढंच ना? तुम्ही आता काळजी नका करू. मी तुमच्याशी लग्न करीन आणि तुमची काळजी घेईन. शहाणे लोक सांगतात की, नवरा नेहमी मूर्खच करावा.''

सदू खूष झाला. म्हणाला,

''चालेल, तू माझी बायको हो. पण मला आजीबाईंकडून अक्कल मिळेल का गं? तुला कोड्यांची उत्तरं येतात?''

''हो, कुठलं कोडं?''

''पाय नाही, पण इकडून तिकडे जाऊ शकतं असं काय?'' सदू म्हणाला.



''अहो, पाणी,'' मुलगी म्हणाली.

तिची हुशारी पाहून सदू खूष झाला. दोघं लग्न करून सुखात राहू लागली. थोड्या दिवसांनी सदू म्हणाला,

''अगं, आपण अक्कल आणायला जाऊ या का?''

''चला.'' बायको म्हणाली.

दोघेजण आजीबाईंकडे गेली.

सदू म्हणाला, ''आजीबाई, ही माझी बायको बरं का! आज द्याल का मला थोडी अक्कल?''

''आधी कोड्याचं उत्तर दे, मग पाहू. असं कोण आहे की, ज्याला मुळात पायच नसतात. मग दोन पाय येतात आणि मग दोनाचे चार पाय होतात?''

सदूला उत्तर सुचेना. पण बायको कानात म्हणाली,

''अहो, बेडूक. बेडकाच्या पिल्लाला दोनच पाय नसतात का? आणि बेडकाला चार असतात.''


''आजीबाई, कोड्याचं उत्तर बेडूक,'' सदू म्हणाला.

''बरोबर,'' आजीबाई मान डोलावून म्हणाल्या, ''अरे, तुझ्याकडे घडाभर अक्कल आहेच आता.''

''कुठाय?'' सदू इकडे तिकडे पाहत म्हणाला.

''तुझ्या बायकोच्या डोक्यात. मूर्खाला शहाणा करायचा एकच उपाय असतो आणि तो म्हणजे त्याला शहाणी बायको मिळवून देणं आणि ती तर तुला मिळालीच आहे.''

सदू आणि त्याची बायको आनंदाने घरी गेली. तेव्हापासून सदूला आपल्याला अक्कल नसल्याचे कधी वाईट वाटलं नाही. कारण त्याच्या बायकोजवळ दोघांना पुरेशी अक्कल होती.




सदू आणि त्याचा मालक

(सेल्टिक लोककथा)

एका गावात पारूबाई नावाची एक गरीब बाई राहत होती. तिला तीन मुलगे होते. म्हादू, दादू आणि सदू. म्हादू आणि दादू स्वतःला फार हुशार समजत. सदूला ते नेहमी बावळट म्हणून चिडवत.

एकदा पारूबाईला असं कळलं की, नशीबपूरचे पाटीलबुवा नोकराच्या शोधात आहेत. पगार भरपूर होता, पण त्यांची एक विचित्र अट होती. अट अशी की, मालक सांगेल ते ते काम नोकराने निमूटपणे करायचं. जो कोणी अगोदर कंटाळेल आणि 'पुरे बाबा तुझं काम,' असं म्हणेल तो हरला. नोकर हरला तर मालकाने त्याच्या पाठीचं कातडं सोलून घ्यायचं आणि पगार द्यायचा नाही. मालक हरला तर मात्र त्याने नोकराला दुप्पट पगार द्यायचा.



तिच्याकडून हे ऐकल्यावर म्हादू डौलाने म्हणाला, ''मी जातो कामाला. पाटीलबुवांना हरवून दुप्पट पगार घेऊन येतो का नाही बघ.'' म्हादू गेला आणि पाटीलबुवांचा नोकर म्हणून राहिला. पण पाटील काम भरपूर करून घेत आणि खायला मात्र अगदी कमी देत. महिना व्हायच्या आधीच म्हादू कंटाळला. त्याने हरल्याचं कबूल केलं आणि पाठीचं कातडं गमावून परत आला.

त्याच्यापाठोपाठ दादू गेला, पण त्याचीही तीच दशा झाली.

सदू मग आईला म्हणाला, ''आई, मी जाऊ का कामाला?''

पारूबाई म्हणाली, ''अरे बाबा, तुझे भाऊ एवढे हुशार, पण त्यांचीही फजिती झाली, नि तू तर बावळा!''

पण शेवटी सदू हट्ट करून नशीबपूरच्या पाटलाकडे गेलाच. दोघांची बोलणी झाली. पगार वीस रुपये ठरला. अट अशी की, मालक सांगेल ते काम सदूने केलं पाहिजे. करीत नाही म्हटलं तर सबंध महिन्याचा पगार कापला जाईल. ह्या उलट सदूने अशी अट घातली की, मालकाने 'काम करू नको' म्हटलं तर सदूला दुप्पट पगार मिळाला पाहिजे. दोघांनी हे मान्य केलं आणि सदूने काम सुरू केलं.

पहिल्या दिवशी पाटलाने दिवसभर काम करून घेतलं आणि संध्याकाळी एक शिळी भाकर सदूला दिली.

दुसऱ्या दिवशी सदू सरळ स्वयंपाकघरात घुसला. स्वयंपाक्याने नुकतीच एक कोंबडी भाजली होती त्यातली अर्धी त्याने खाऊन टाकली.



पाटील रागावून म्हणाले, ''हे रे काय, खुशाल खात बसला आहेस आणि काम कोण करणार?''

''वा रे वा,'' सदू म्हणाला, ''काम तर करणारच आहे. पण खायला नको वाटतं मला? माझं काम पसंत नसेल, तर तसं बोला.''

पण पाटील तसं कसं म्हणणार? मग अट मोडली नसती का?


तो दिवस गेला. तिसरा दिवस उजाडला. त्या दिवशी लांबच्या शेतावर कामाला जायचं होतं. सदू पहाटेच उठून तयार झाला, पण पाहतो तो न्याहारीला अर्धी भाकरी.

सदूने मुकाट्याने भाकरी खाल्ली. मग पाटलिणीला म्हणाला, ''पाटलीणबाई, माझं जेवण देता का बांधून? म्हणजे उगीच काम सोडून घरी यायला नको.''

पाटलिणीने त्याला दोन भाकरी, कालवण, कांदा असं बांधून दिलं.

सदूने तेही खाऊन घेतलं. मग पुन्हा पाटलिणीला म्हणाला, ''पाटलीणबाई, रात्रीचं जेवणही द्या; म्हणजे बरं.''

पाटलिणीला वाटलं, शेतावर मुक्काम करायचा असेल. तिने आणखी दोन भाकरी, कालवण आणि कांदे दिले. सदूने तेही खाऊन घेतलं. मग मालकाकडे जाऊन म्हणाला, ''पाटील, रात्रीचं जेवण झाल्यावर तुमच्या गड्यानं काय करावं?''



पाटील म्हणाले, ''झोपावं.''

सदू लगेच जाऊन झोपला. जरा वेळाने पाटलांच्या लक्षात आलं की सदू झोपलाय. त्यांनी रागारागाने त्याला उठवलं आणि म्हणाले. ''अरे, हे काय चाललंय? दिवसा झोपा काढतोस!''

''भले!'' सदू म्हणाला, ''तुम्हीच तर झोप म्हणालात. माझं काम नको असेल तर, तसं सांगा.''

पाटील गप्प बसले; कारण अट मोडली असती ना!

दुसरा दिवस उजाडला. सदूने विचारलं, ''मालक, आज काय काम करू?''

पाटील म्हणाले, ''शेतात नांगर धर आज.''

सदू शेतात गेला. जरा वेळाने पाटील जाऊन बघतात तो बैल नांगर ओढताहेत आणि सदू नांगर घट्ट धरून उभा.

''अरे, हे काय?''

''नांगर धरलाय.''

''नीट काम कर आणि शेत नांगर.''

''हं. असं सांगा की!'' सदू म्हणाला आणि त्याने दिवसभर नीट काम केलं.

पाटलांनी मग सदूला गाई राखण्याचं काम दिलं. पाटील म्हणाले, ''सदू, गाई चरायला जंगलात ने. कपिला गाईला अगदी नीट सांभाळ. बाकीच्यांची एवढी काळजी नाही.''

सदूने गाई जंगलात नेल्या. जरा वेळाने पाटील जाऊन पाहतात तो सदूने कपिला गाईला एका झाडाला बांधून ठेवलंय आणि झाडाखाली स्वस्थ निजलाय. बाकीच्या गाई वाटेल तिथे हिंडताहेत.

पाटलांनी रागावून सदूला उठवलं. पण तोवर व्हायचं ते झालं होतं. दोन वासरं हरवली होती.

पाटील म्हणाले, ''सदू, खुशाल झोपा काढतो आहेस. ती वासरं कुठे गेली आहेत, ती आधी शोधून आण.''

सदू डोळे चोळत उठला आणि म्हणाला, ''कुठे शोधू?''

''सगळीकडे शोध. जिथं वासरं असू शकतील तिथे शोध. जिथे असणं शक्य नाही तिथेसुद्धा शोध.'' पाटील रागाने म्हणाले.

सदू लगेच छपरावर चढला आणि कौलं उसकटू लागला.

पाटील रागावले,

''हे काय करतो आहेस?''

''वासरं शोधतोय!''

पाटील कसाबसा राग आवरून म्हणाले,

''अरे, वासरं छपरावर कशी असतील? समजा, तुझी वासरं हरवली असती तर कुठे शोधली असतीस?''

सदू लगेच छपरावरून खाली उतरला आणि त्यानं वासरं शोधून आणली.

पण एक दिवस मात्र अतीच झालं. एक दिवस पाटलीणबाई सदूला म्हणाल्या, ''सदू, मी जरा कामात आहे. तू जरा बाळाला घे.

अगदी हाताचा पाळणा करून बाळाला सांभाळ.''

सदूने लगेच सुरी घेतली आणि पाटलांकडे जाऊन म्हणाला, ''पाटील, बाळासाठी हाताचा पाळणा करायचा आहे. कुणाचे हात कापू?''

आता मात्र पाटील चिडले,

''मूर्ख आहेस. कुठून तुला कामाला ठेवलं, कुणास ठाऊक.''

सदू लगेच म्हणाला, ''पाटील, अट मोडली बरं का! टाका माझे दुप्पट पैसे!''

पाटील अट मोडल्याबद्दल स्वतःवरच चिडले. तेवढ्यात सदू म्हणाला, ''आणि सुरी पण आणा. तुमच्या पाठीचं कातडं काढून घेतो.''

आता मात्र पाटील घाबरले आणि त्यांनी निमूटपणे सदूला ठरल्याप्रमाणे दुप्पट पगार दिलाच; पण आपली पाठ वाचवण्यासाठी आणखी पैसेही दिले.

शेवटी बावळट सदूच हुशार ठरला!





बोलणारा बुद्ध

(तिबेटी लोककथा)

एक होता शेतकरी. त्याला एक मुलगी होती. एकुलती एक, म्हणून लाडकी. शिवाय सुंदर इतकी की, तिच्यावरून नजर हलू नये. फुलासारखा नाजूक चेहरा, चमकणारे तेजस्वी डोळे आणि काळेभोर केस. अतिशय शहाणी आणि कामसू होती ही मुलगी. सूत कातण्यात तर तिचा हात कोणीच धरू शकलं नसतं. कोळ्याच्या जाळ्याच्या धाग्यासारखे बारीक मऊ सूत ती कातत असे.

आपल्याशी तिचे लग्न व्हावं असं गावातल्या प्रत्येक तरुण मुलाला वाटे, पण मुलगी मात्र कोणाकडेच विशेष लक्ष देत नसे.

शेतकऱ्याकडे गाईगुरे सांभाळण्यासाठी एक मेंढपाळ होता. मोठा हुशार आणि दणकट पोरगा होता. स्वभावाने फार चांगला होता. सगळ्यांना तो आवडे, पण अगदी गरीब होता तो. कसेबसे पोटापुरते मिळवीत होता एवढेच. पण शेतकऱ्याच्या मुलीला हा मुलगा आवडे. त्यालाही ती खूप आवडे.

हळूहळू दोघांनाही वाटू लागलं की, आपलं लग्न व्हावं. पण शेतकऱ्याला आपल्या मुलीसाठी श्रीमंत नवरा हवा होता. ह्या गरीब मेंढपाळाला तो आपली मुलगी देणे शक्यच नव्हते. त्यामुळे दोघंही मनातून दुःखी होती.

एके दिवशी मेंढपाळाने शेतात उंदराचे सापळे लावून ठेवले होते. त्यांतल्या एका सापळ्यात एक उंदीर सापडला. मेंढपाळाला हा उंदीर म्हणाला, ''मला जाऊ द्या. मी उंदीरराजाचा मुलगा आहे. मला सोडलेत तर माझे वडील तुम्हांला मोठे बक्षीस देतील.''

मेंढपाळाला एक युक्ती सुचली. मिळालेल्या संधीचा त्याने फायदा घ्यायचे ठरवले. तो म्हणाला, ''ठीक आहे. तुझ्या वडिलांना बोलाव.''

उंदराने शीळ घातली. त्याबरोबर पावलांचा आवाज आला आणि उंदीरराजा आला.

उंदीरराजा म्हणाला, ''माझ्या मुलाला सोड, तुला हवे ते मी तुला देईन.''

मेंढपाळ म्हणाला, ''सोडीन तुझ्या मुलाला. पण तीन दिवसांत तू इथून देवळापर्यंत एक भुयार खणले पाहिजेस.''

''एवढेच ना!'' उंदीरराजा म्हणाला.

मग त्याने सर्व उंदरांना जमा केले आणि देवळापर्यंत भुयार तयार केले. देऊळ बुद्धाचे होते. तेथे भगवान बुद्धाची मोठी मूर्ती होती.

शेतकऱ्याची बायको रोज पहाटे भगवान बुद्धाच्या दर्शनाला जाई. भगवान बुद्धाच्या समोर जमिनीवर डोके ठेवून ती बसे आणि प्रार्थना करी.

भुयार तयार झाले त्याच्या दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे शेतकऱ्याची बायको देवळात गेली. बुद्धाची प्रार्थना करून केली.

आणि अचानक भगवान बुद्धाच्या मूर्तीतून आवाज आला, ''तुमच्या मुलीचे मेंढपाळाशी लग्न कर म्हणजे स्वर्गाची दारे खुली होतील.''

शेतकऱ्याची बायको चकित झाली, घाबरलीही. देवळातून धावतच बाहेर पडून ती घरी आली. ती पोहचेपर्यंत मेंढपाळ भुयारातून घरात येऊन अंगण झाडीत होता. बुद्धाच्या मूर्तीमागून तोच बोलला होता. पण हे गुपित कुणालाही माहीत नव्हते.

शेतकऱ्याची बायको घाईघाईने घरात गेली आणि शेतकऱ्याला म्हणाली, ''ऐकलेत का? आपल्याला जर मेल्यावर स्वर्गात जायचे असेल, तर आपण ताबडतोब आपल्या मुलीचे या मेंढपाळाशी लग्न केलं पाहिजे.''

''काय?,'' शेतकरी रागावून म्हणाला, ''शुद्धीवर आहेस का? माझ्या मुलीचं त्या भिकाऱ्याशी लग्न करू?''



''भगवान बुद्धानेच सांगितलं आहे.''

''बुद्ध बोलायला कधीपासून लागले?''

''तुम्ही स्वतः चला पाहिजे तर आणि ऐका,'' बायको म्हणाली.

दुसऱ्या दिवशी शेतकरी स्वतः बायको-बरोबर देवळात गेला. त्याने बुद्धाची प्रार्थना केली आणि काय आश्चर्य! बुद्धाच्या मूर्तीतून पुन्हा आवाज आला.

''तुझ्या मुलीचं मेंढपाळाशी लग्न केलंस तरच स्वर्गाची दारं तुला खुली होतील.''

''अरे बापरे, खरंच, भगवान बुद्ध बोलले!'' शेतकरी घाबरून म्हणाला.

त्याने घरी जाऊन लग्नाची तयारी केली आणि आपल्या मुलीचं मेंढपाळाशी लग्न लावलं.

लग्नानंतर शेतकऱ्याची मुलगी मेंढपाळाला म्हणाली, ''आपण दोघांनी मिळून भगवान बुद्धाच्या दर्शनाला जायला पाहिजे बरं का! त्यांनी सांगितलं, म्हणूनच बाबांनी माझं तुमच्याशी लग्न लावलं.''

त्यावर मेंढपाळ हसून म्हणाला, ''भगवान बुद्ध स्वतः बोलले? आश्चर्य आहे.''

भुयाराचं गुपित मात्र त्याने कधीच कोणाला सांगितलं नाही.

